# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०४**




वर्ष सातवे / अंक ५ / एप्रिल २००६

# संपादकीय


## व्याख्यान परंपरा

विद्या प्रसारक मंडळाला प्रगतीच्या दिशेकडे आणणारे माजी अध्यक्ष, आमचे प्रेरणास्थान व द्रष्टे शिक्षणमहर्षी डॉ. वा.ना. बेडेकर यांचा दुसरा स्मृतिदिन १४ एप्रिल रोजी येत आहे.

आपल्या संस्थेच्या शैक्षणिक संस्थांत विचारांची देवाणघेवाण व्हावी, विचारप्रवृत्त करणारी निरनिराळ्या विषयांवरील वक्त्यांची भाषणे व्हावीत, चर्चा, परिसंवाद व्हावेत, त्यात आपल्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग असावा असे मोठ्या डॉक्टरांना नेहमी वाटे. अनेक मोठ्या व्यक्तींच्या भाषणांच्या प्रसंगी ते अध्यक्ष म्हणून उपस्थित असत, पण भूमिका श्रोत्याची निभावीत. कला वाणिज्य महाविद्यालयात एकदा विजय मर्चंट आले होते. त्यांचे भाषण ऐकून डॉक्टर भारावून गेले होते. बाबासाहेब आमटे, बापू नाडकर्णी, सुरेश खरे... कितीतरी कार्यक्रमांना डॉक्टर जातीने हजर असत. त्यांना स्वतःला भाषण करण्यापेक्षा काम करणे अधिक पसंत असे. त्यामुळे आपला अध्यक्षीय समारोप ते अगदी मोजक्या शब्दात करीत. पण इतरांचे अनुभव, विचार ऐकून घेत, त्यातून प्रेरणा घेत. 'दुसऱ्यांचे ऐकून घ्या' हा व्यवस्थापन नेतृत्वातील उत्तम गुण त्यांच्यात होता म्हणून आमच्या शैक्षणिक प्रयत्नांचे नेतृत्व अखेरपर्यंत निष्ठेने त्यांनी केले.

या दुसऱ्या स्मृतिदिनी विचारमंथनाची ही परंपरा जपली जाईल असे अतिशय अभ्यासपूर्ण व्याख्यान परिसरात व्यवस्थापन अभ्यास संस्थेने आयोजित केले आहे. गेल्याच दिशाच्या संपादकीयात आम्ही म्हटल्यांप्रमाणे गुणवत्तेचा निदिध्यास हवा आहे. असा ध्यास असणारा भारतीय असेल तर सर्वच क्षेत्रात त्याचे वर्चस्व निर्माण होईल. यंदाच्या स्मृतिदिनाच्या भाषणात प्रा. वाय. के. भूषण यांचा विषय 'अर्थकरणातील वर्चस्व' हाच आहे. भूषण स्वतः व्यवस्थापन तज्ज्ञ आहेत. त्यामुळे असे वर्चस्व मिळविण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन शिक्षणाचे महत्त्व ते अधोरेखित करतील, समजाऊन सांगतील. प्रा. वाय. के. भूषण, नारायण मूर्ती ज्या परिसरात येतील तेथील प्रत्येक अस्तित्वाला प्रेरणा देतील. डॉक्टरांच्या इच्छेप्रमाणे व्याख्यान परंपरा चालू ठेवणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.

मात्र या विचारमंथनात सक्रिय सहभाग हा हवाच!



# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें  तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥ २ ॥

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४ ॥

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।  बोलते ते अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन  । मार्तंड जे तापहीन । ते सर्वाही सदा सज्जन ।  सोयरे होतु  ॥ ६ ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं । भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें ।  हो आवें जी ॥ ८ ॥

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो ।  सुखया जाला ॥ ९ ॥




**वर्ष सातवे / अंक ५/ एप्रिल २००६**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक १०वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री राघवेन्द्र स्वामी महाराज जीवन व कार्य (प्रकरण पाचवे ) | शं. बा. मठ | ३ |
| २) | प्रश्न : वीजेचा, तुमचा, आमचा | प्राचार्य डी. के. नायक | ८ |
| ३) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | १४ |
| ४) | मुलांनी चित्रं काढायलाच हवीत | सौ. मंजिरी दांडेकर | २२ |
| ५) | भीती | प्रसन्न गोविंद कुलकर्णी | २४ |
| ६) | शिक्षणसंस्थांच्या 'हृदयाबद्दल' | दीपाली नंदलाल बोरकर | २५ |
| ७) | रणांगण : रसग्रहण | सौ. मानसी देशमुख | २७ |
| ८) | संजीवनी बालबोध गीता | आशा भिडे | ३१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७० वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी, जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश **''विद्या प्रसारक मंडळ चालू खाते दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# श्री राघवेन्द्र स्वामी महाराज
# जीवन व कार्य (प्रकरण पाचवे)

*राघवेंद्र स्वामी महाराजांचा भारतीय तत्त्वज्ञान, तत्त्वज्ञान मीमांसा व प्रसार यावरील ठसा अमिट आहे. ज्यांच्या संबंधांतील वेद व संस्कृतीअभ्यासक शंकरराव मठांची ही लेखमाला - संपादक*

**स्वामींबद्दल ज्योतिषांचे भाकित**

स्वामींची पत्रिका तीन ज्योतिष पंडिताकडे दिली गेली. प्रत्येकाने आपले स्वतंत्र मत दिले. एक ज्योतिषाने स्वामींना ७५ वर्षाचे जीवन असल्याची ग्वाही दिली. दुसऱ्याने स्वामी ३०० वर्षांचे होतील असे सांगितले. तिसरा म्हणाला स्वामी ७०० वर्षे जगतील. या विविधतेकडे पाहून सभेतील लोक हसावयास लागले. ज्योतिषांची पंचाईत झाली. स्वामींनी परिषदेला सांगितले तिघेही आपआपल्या परीने बरोबर आहेत. हे स्वामींचे भाषण ऐकून सभेला आश्चर्य वाटले. स्वामींची पुस्तके ३०० वर्षे उत्तम गाजतील. आणि लोकांची दु:खे स्वामी ७०० वर्षे पर्यंत दूर करत राहतील. असा तिसऱ्याचा अर्थ आहे. या करता तीनही ज्योतिषांचे स्वामींनी स्वागत केले. याप्रमाणे स्वामी लोकांना कसे वागवीत याची थोडीशी कल्पना येईल.

स्वामी नम्र सेवक होते त्यामुळे प्रभूची इच्छा त्यांना पाळावी लागत असे. आजही स्वामी त्यांना शरण येणाऱ्यांचे दु:ख दूर करतात. जिवंतपणी जे काम त्यांनी केले, त्यांच्या वृंदावन प्रवेशानंतरही तेच काम अखंड करीत आहेत.

भजतां कल्प वृक्षाय नमतां काम धेनवे । ते लोकांचे कामधेनू व कल्पवृक्ष आहेत.

**स्वामींच्या जीवनातील दिनक्रम**

संन्यासी ज्या वेळी भौतिक गोष्टींचा त्याग करतो तेव्हापासूनच तो देवाचा सेवक बनतो. जगण्यापुरता त्याचा भौतिक संबंध राहतो. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा संन्याशालाही आवश्यकच आहेत. प्रवासातही आत्यंतिक गरजांखेरीज त्याचा संबंध राहत नाही. तो काटेकोरपणे वागतो. द्वैत संन्याशाला पूजा व ध्यान ही करावी लागतात. त्याचे नित्य वाचन लिखाण इत्यादीसाठीचे साहित्य त्याला अपरिहार्य आहे. तो मठाधिपती असल्यास त्याची सारी व्यवस्था त्याला पाळावी लागते. आपल्या पूर्व सूरींनी घालून दिलेल्या मार्गाचा आलेख राघवेन्द्र स्वामी चोखाळत होते. लिखाण व संशोधनात्मक गोष्टीत फरक पडत असे. त्यांच्या भक्तांना स्वामी आधारभूत होते. ते देवाकडे सर्वांच्याच कल्याणासाठी प्रार्थना करीत. स्वामींची दैनंदिनी समजावून घेतल्यास त्याचा उलगडा होऊ शकेल.

ते सकाळी लवकर उठत. देवापुढे संगीत गायिले जाई. मठाची सर्व कामे, पाठ देणे, पूजा करणे, लिखाण करणे, संशोधनात्मक लिहिणे, पंडिताकडून पुराण ऐकणे, द्वादशस्तोत्र ऐकणे इत्यादी होई. नंतर मूळराम व इतर देवताना वंदन करीत. शास्त्रवेत्ते व वेदवेत्ते यांचे शुभाशीष स्वीकारीत, मग ते तुळशी वृंदावनाकडे जात. लक्ष्मीची पूजा करीत. हनुमानाला वंदन करीत. पालखीत बसून जवळच्या नदीवर जात व स्नान करीत. काही स्तोत्रे म्हणत, काही मंत्र म्हणत, स्नान करतेवेळी पुरुषसूक्त म्हणत. स्नानानंतर गोपीचंदन लावीत. गायत्रीमंत्राने सूर्याला अर्घ्य देत.

मठाच्या सभागृहात आल्यानंतर पूजा करीत. पंचामृत पूजा करीत. नीरांजन ओवाळीत, फुलांनी देव सुशोभित करीत. मग ते गुरुला वंदन करीत. खडावा घालून विद्यार्थी बसतात त्या चौकात येत. त्यांचा नित्य पाठ घेत.

बरेच विद्वानही त्यांचे भाषण ऐकण्यासाठी येत. ही भाषणे सर्वांसाठी खुली होती. तेथे जातपात इत्यादी पाळले जात नसे. मध्वसूत्र भाष्य वाचन व त्याचे विवरण केले जाई. काही वेळा अध्यात्मिक, तात्विक विषयावर भाषण असे. स्वामी उत्तम वक्ते होते. स्वत:च लिहिलेल्या लेखनावरही ते भाषणे देत. विष्णूचे श्रेष्ठत्व हा भाषणाचा प्रतिपाद्य विषय असे. काही वेळेला शंकांचे निरसनही स्वामी करीत. व शांतपणे समजावून देत.

''अत्रभ्रम निरासनोत्सुक: सस्मितं सदय अब्रवीत् गुरु:।''

प्रश्न विचारणाऱ्यांना यत् किंचितही न दुखावता उत्तरे देत. दुपारच्या भोजनापर्यंत हे चाले. स्वामी पुन: स्नान करीत. गोपीचंदन लावीत. ध्यान करीत. घंटानाद होताच पूजा सुरु होत असे. कलश पूजनानंतर मूळराम व इतर देवतांना स्नान घालत. पंचामृत पूजा होई. नीरांजन, आरती, मग वंदना केली जात असे. डोक्यावरील वस्त्र काढून स्वामी देवतांवर डोके टेकवत. देवता पेटीत ठेवीत. पुन: घंटानाद होई. सारे लोक भोजनासाठी जात. भोजनोत्तर स्वामी भाषण देण्यासाठी पुन: सभागृहात येत. सभागृह मोठे होते. तेथे बसण्यासाठी व बोलण्यासाठी सारी व्यवस्था होती. ही व्यवस्था कायम स्वरुपाची होती.

वरच्या थरातील शिष्यांना ही भाषणे उपयुक्त होती. तेथे चर्चा चाले. विधी (कायदा) समीक्षा, तत्त्वज्ञान हे विषय तिथे चर्चिले जात. तेथे व्यापकपणे ज्ञानदान चाले, हे सारे नियमितपणे चाले. शिकविणारे साक्षात तसे वागत, व आदर्श उभे करीत. स्वामी कित्येक तास तेथे राहत. ते जणू विद्यापीठच होते. सर्व शंका, गैरसमज व अज्ञान दूर करीत व ज्ञान प्रकाश देत.

यानंतर आपल्या भेटीसाठी उभ्या असलेल्या लोकांना दर्शन देत. आशीर्वाद देऊन त्यांच्या गरजा भागवत. संध्याकाळ झाल्याची वर्दी दिली जात असे. स्वामी सायंकाळच्या आन्हिकांसाठी जात. सायंकाळी पूजा प्रार्थना, पुन: स्नान करुन गोपीचंदन लावीत. संध्या वंदन करीत. मूळरामाला नीरांजन ओवाळीत. दशावतार स्तोत्र म्हणत. पूजा आटोपून देवासमोर लोटांगण घालीत. थोडा वेळ तात्विक चर्चा मग देवापुढे गायन होत असे.

अशा प्रकारे संपूर्ण दिवस देवासाठी घालवत. वीणा वाजवत ते देवापुढे नृत्य करीत. ध्यानावस्थेत श्रीवेणु गोपाळाचे त्यांना दर्शन होत असे. त्यांचे एक प्रसिद्ध गीत असे होते' 'इंदू येनगे गोविंद निन्न पादारविंद तोरो मुकुंदने।'' हे गोविंदा माझ्यावर अनुग्रह कर व तुझे चरण कमळ मला दाखव.

**नूतन मुख्य पीठ**

विजयनगर राज्याच्या पाडावानंतर स्वामींच्या पूर्वआचार्यांनी कुंभकोणम् इथे मुख्य पीठ केले होते. विजयेन्द्र तीर्थ - राघवेन्द्राचे आजे गुरु हे कुंभकोणम् येथे पाठ देत. त्यांचे शिष्य सुधीन्द्र तीर्थ - स्वामींचे गुरु, ह्यांनी कुंभकोणम् हे प्रमुख पीठ केले. स्वामी सुधीन्द्रानंतर सुरुवातीला राघवेन्द्र स्वामींनी कुंभकोणम् पीठातून कार्य चालविले व भारतभर प्रवास केला. अडोणीला आले. त्या वेळी मनचली ही भूमी आदर्श वाटली. व येथून आपले कार्य जोरात चालेल असे त्यांना वाटले. त्या जागी तत्त्वज्ञान पीठ व वृंदावन बांधावे असे त्यांना वाटले. कारण ती भूमी पुरातन काळापासून पवित्र असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. कुंभकोणम् पार दक्षिणेत होते. तेथे देखील राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता वाटली. तेथील हिंदु राजे देखील आपआपसातील हेव्यादाव्यामुळे धार्मिक गोष्टीकडे लक्ष देईनासे झाले. शांतपणे अध्यापन, ध्यान हे तेथे जमेना. तंजावरचे राजे दुर्बळ होते. त्यांना इतरावर अंमल चालविणे कठीण जाई. धार्मिक संस्था त्यामुळे अडचणीत आल्या.

आतापावेतो स्वामींनी बरेचसे महत्त्वाचे लिखाण केले होते. अडोणी येथील बादशहा व दिवाण हे अनुकूल

आहेत असे पाहून स्वामींनी आपले पीठस्थान हलविण्याचे ठरविले. कुंभकोणमूहून अडोणी येथील मनचली येथे येण्याचे केले. मनचली उभी करण्यास सर्व लक्ष देण्यात आले. बादशहाने मनचली व सभोवताली सलग जमीन देऊ केली व मदतही केली. दिवाण स्वामींचा भक्तच होता. ती उजाड वाटणारी जागा भरभराटीला आली. मठ बांधणे सुरु झाले. तेथे पूजा पाठ अध्यात्मिक चर्चा आदी सुरु झाल्या. स्वामींनी सर्व ठिकाणी लिहिलेल्या द्वैत सिध्दांताचे एकत्रीकरण केले. त्यावर भाष्ये लिहिली. सुरेल आवाज व अप्रतिम वीणा वादनाने भगवंताला प्रसन्न करुन घेतले. कृष्ण भक्तीच्या अनेक संगीतिका त्यांनी लिहिल्या. त्यांना कृष्णाचे वेणुगोपाल हे नाव पसंत होते. संगीत म्हणता म्हणता ते भाव समाधीत जात.

मनचली येथे सुदृढ पायावर मध्व संप्रदायाची प्रतिष्ठापना केली. १६२३ ते १६७१ हा त्यांचा कार्य काळ आहे. हजारो शिष्यांचे कल्याण केले. मध्व सिध्दांत हा मुख्य पाठ असे.

**त्यांचे चार प्रमुख शिष्य -**

चार प्रमुख शिष्योत्तम म्हणजे नारायणाचार्य (यानी राघवेन्द्र विजय लिहिले) अप्पणाचार्य, वेंकण्णा दिवाण व वेंकण्णाचार्य (स्वामींच्या पश्चात गादी चालविली).

नारायणाचार्य हे स्वामींच्या पूर्वाश्रमीचे भाचे. हे उत्तम कवी होते. व राघवेन्द्राबद्दल अत्यंत आदर असल्याने राघवेन्द्र विजय हे काव्य लिहिले. दहा सर्गांचे हे काव्य आहे. याच्यात स्वामींचे बरेचसे जीवन चरित्र ग्रथित केले आहे.

अप्पणाचार्य हे एकनिष्ठ भक्त होते. आपल्या हुशारीने व भक्तीने ते स्वामींना प्रिय झाले. त्यांनी राघवेन्द्र स्तोत्र लिहिले व हजारो भक्तांना त्याचा लाभ करुन दिला. अप्पणाचार्य बिच्छलीचे, मनचली शेजारच्या गावचे. हे गाव तुंगभद्रा नदीच्या पलीकडच्या तीरावर आहे. ते स्वामींच्या सहवासात अनेक तास घालवीत.

वेंकण्णा दिवाण हे स्वामींच्या निकट राहण्याचा प्रयत्न करीत. अगदी गरीबीतून हे वरच्या पदाला पोचले होते.

स्वामींच्या पूर्वाश्रमीचा पुतण्या गुरुआचार्याचा मुलगा वेंकटनारायणाचार्य हा हुशार होता व त्यांनी संन्यास घेतला. स्वामींना वृंदावनात प्रवेश करावा असे वाटताच त्यांनी वेंकण्णाला बोलावून घेतले व त्याला आपला वारस बनविला. त्याचे नाव योगींद्रतीर्थ असे ठरविले. (ख्रिस्ताब्द १६७१-१६८८).

स्वामी मंत्रालयात स्थिर स्थावर झाले. सगळ्या गोष्टी सुरळित पार पडू लागल्या. स्वामींचे पूजापाठ व भाषणे अव्याहत चालू झाली.

**वृंदावन प्रवेशाची योजना**

एके दिवशी स्वामींनी दिवाणाला बोलावले. दिवाणांना आश्चर्य वाटले. स्वामींनी स्पष्टपणे त्यांना कथन केले. स्वामीचे शारीरिक कार्य आता समाप्तीला आले आहे. हा देह वृंदावनात आत्मसात करावा. आम्ही शरीराने नाहीसे होतो. मात्र हरीकृपेमुळे आम्ही प्रत्येक भक्ताच्या हृदयात वास करतो. आम्ही वृंदावनात राहून लोकांचे कल्याण करु. ही कामे हरीनीच आम्हावर सोपविली आहेत. दिवाणांचे सांत्वन करीत स्वामीं पुढे म्हणाले तुमच्या हाकेला आम्ही उपस्थित राहू, अश्रूचा एक थेंबही गाळू नका. आपले कर्तव्य करीत रहा. वृंदावन मजबूत बांधून काढा. ७०० शाळिग्राम दगड आणा. हे गंडकी नदीत मिळतात. इतर सामान स्थानिकच प्राप्त होईल. लवकर तयारीला लागा.

दुःखाकुल दिवाणांना गुरुची आज्ञा पाळावीच लागली. आपल्या माणसांना गंडकीला पाठविले. आणि

पाथरवटांना वृंदावनासाठी दगड तासावयास सांगितले. काही महिन्यांनी सगळी सामग्री गोळा करण्यात आली. स्वामींनी जातीने पाहणी केली. वृंदावनासमोर एक मारुतीची मूर्ती बनवून स्थापना करण्यास सांगितले. राम लक्ष्मण लंकेला जाताना ज्या खडकावर बसले होते तो खडक आतून पोकळ आहे तो वृंदावनासाठी घ्या. स्वामींच्या सांगण्याप्रमाणे वृंदावन तयार केले.

सगळी तयारी झाली, स्वामींनी योगीन्द्रतीर्थांना वारस नेमले. मूळरामाची पूजा केली व सर्वासमक्ष ती मूर्ती योगींन्द्राना दिली. मठा संबंधीची कागदपत्रे, देवता इत्यादी त्यांच्या स्वाधीन केले. स्वामींना जिवंत समाधी घ्यावयाची होती. जमलेल्या समाजाला सांगितले - आम्ही आता शरीराने नाहीसे होऊ, आम्ही वृंदावनात ध्यान लावून बसू. वेंकण्णा व इतरांनी दगडांनी वृंदावन बंद करावे. शाळिग्रामानी वृंदावनातील पोकळी भरावी. डोक्यावरील भाग मागाहून बंद करावा. तो दिवस उजाडला. शालिवाहन शके १५९३, मंगळवार विरोधीनाम संवत्सर श्रावण गुध्दर या दिवशी स्वामींनी वृंदावन प्रवेश केला (ऑगस्ट १६७१) सगळे लोक रडू लागले. तेथे जमलेल्या प्रत्येकाला पोरके वाटावयास लागले. स्वामी दृष्टीआड झाले.

अप्पणाचार्यांना ही घटना वज्राघातासारखी वाटली. दुर्दैवाने शेवटच्या घटकेला ते स्वामींना पाहू शकले नाहीत. शोकाकुल अवस्थेत तेथेच राघवेन्द्र स्तोत्र रचले. त्यांना शब्द आठवेनात. वृंदावनातून आवाज आला. स्वामी सचेतन असावेत हेच खरे.

अशा प्रकारे स्वामी शरीर रुपाने नाहीसे झाले. आज त्याला तीनशे वर्षावर काळ लोटला आहे. ज्योतिषाने सांगितल्याप्रमाणे स्वामी ७५ वर्षे शरीराने राहिले. पुढील ३०० वर्षे वृंदावनाच्या रुपाने अद्याप आहेत. मंत्रालय एक तीर्थक्षेत्र झाले आहे. भारतातील भक्त तेथे येतात. हे स्थान रेल्वेने जोडलेले आहे. हजारो भक्त येऊन स्वामींचा आशीर्वाद प्राप्त करुन घेतात. प्रत्येकाने हा अनुभव घेऊन पाहावा असे म्हणावेसे वाटते.

**राघवेन्द्र स्वामींची ग्रंथ संपदा**

ग्रंथापेक्षा प्रत्यक्ष भेटीनेच अनेकांचे दुःख निवारण करणे स्वामींना महत्त्वाचे वाटे. त्यांचे वाङ्मयदेखील मार्गदर्शक आहे. परंतु त्याचा साकल्याने बोध होणे महा कठिण आहे. माधवाचार्याने मांडलेला सिध्दांतच स्वामींनी आपल्या रसाळ वाणीत मांडलेला आहे. टीकाचार्य व व्यासराय काळी माधवद्वैत सिध्दांत हा उच्च थराला पोचला. विजयनगरच्या पाडावामुळे द्वैत सिध्दांत हा प्रभावीपणे परिणाम करू शकला नाही. जयतीर्थ (टीकाचार्य) यांच्यानंतर तो प्रभावीपणे मांडण्याचे प्रयत्न करण्यात आले नाहीत. व्यासरायांच्या पश्चात भाष्यकारांचे युग निर्माण झाले असे विद्वान सांगतात. विजयेन्द्रतीर्थ, श्रीवादिराज, रघोत्तम विद्याधीश व श्रीराघवेन्द्रतीर्थ यांचा हा काळ पुनर् निर्मितीचा गणला जातो. त्याला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करुन घेणे हा महत्त्वाचा हेतू होता. त्यामुळे या काळात कसोशीने प्रयत्न झाले आहेत. पूर्व सूरींचे ग्रंथ पुनः समजावून सांगण्याचा प्रयत्न झाला. यादवराय व श्रीनिवासतीर्थ यांनी उत्तम टीका, विवरण इत्यादी लिहिले. दासकूटाने पण याला हातभार लावला. सोप्या कानडी भाषेत त्यांनी रचना केली. दास व भाष्यकार या मधील दुवा म्हणजे स्वामी होत.

राघवेन्द्र स्वामी रसाळ पद्धतीने तत्त्वज्ञान मांडत. एकदा लिहिलेला मजकूर पुनः लिहीत नसत. पुढे उद्धृत केलेले ग्रंथ ही स्वामींचे म्हणून सांगण्यात येतात. १) परिमल - विद्यार्थी असताना लिहिले २) त्रयी - तीन वेदासंबंधी ३) मंत्रार्थमंजरी ४) पंचसूक्तभाष्य - पुरुषसूक्त इत्यादी ५) दशोपनिषद भाष्य ६) गीतावृत्ती - गीतार्थ संग्रह ७) गीताभाष्य प्रमेय दीपिका-यावर भाष्य ८) गीता तात्पर्य यावर भाष्य ९) तंत्र दीपिका १०) न्याय मुक्तावली ११) ब्रह्मसूत्र भाष्य - भावदीप तत्त्व प्रकाशिका

१२) अणुभाष्यवरील भाष्य तत्त्वमंजरी १३) दास प्रकरण १४) चंद्रिका प्रकाश १५) न्यायदीप १६) प्रमात पद्धती १७) वादवळी १८) गूढभाव प्रकाशिका १९) प्रस्थानकल्प २०) श्री राम चरित्र मंजिरी २१) श्रीकृष्ण चरित्र मंजिरी २२) भाव संग्रह महाभारत तात्पर्य २३) भट्ट संग्रह २४) प्रमेय संग्रह.

परिमल ग्रंथाने ते प्रसिध्द झाले. विद्यार्थी दशेतच परिमलाचार्य असे नाव पडले. न्यायसुधा या ग्रंथावर हे एक अप्रतिम भाष्य आहे. भट्ट संग्रह म्हणजे पूर्व मीमांसा. मध्वाचार्यांना ही चांगली अवगत होती. भट्ट संग्रह हा ग्रंथ हत्तीवरुन मिरविण्यात आला. हे स्वामींचे कर्तृत्त्व गीतावृत्ती -गीतेवरील माध्वभाष्य, जयतीर्थांच्या टिपणीवरील सुधारित तात्पर्य निर्णय भाव.

उपलब्ध झालेल्या ग्रंथांवरुन स्वामींजींचे जीवन व कार्य हे शब्द चित्र रेखाटले आहे. स्वामींचे चरित्र रेखाटावेसे वाटले. त्याचा आपणा सर्वांना उपयोग होईल. हे रेखाटण स्वामी चरणी समर्पण.

**- शं.बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

वृत्तपत्राच्या नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय १९५६) 'व्हिपीएम् दिशा' मासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.

१) **प्रकाशन स्थळ** : विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णू नगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

२) **प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व, व पत्ता** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे

३) **संपादकाचे नाव, राष्टीयत्व व पत्ता** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे

४) **प्रसिद्धीचा नियत काल** : दर महिन्याल्या.

५) **एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदारव्यक्तींसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे व पत्ते** : विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णू नगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

६) **मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता** : श्री. विलास राजाराम सांगुर्डेकर, भारतीय, २२, परफेक्ट प्रिन्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, मखमली तलावाजवळ, ठाणे (प.) - ४०० ६०१.

मी डॉ. विजय वासुदेव बेडेकर जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

# प्रश्न : वीजेचा, तुमचा, आमचा



प्राचार्य डी. के. नायक

*२८ फेब्रु. २००६ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने व्ही. पी. एम्. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डी. के. नायक यांचे पर्यायी उर्जा स्तोत्रांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान ज्या पॉवर पॉईंट सादरीकरणाच्या साहाय्याने त्यांनी केले त्या चौकटींचे भाषांतर 'पॉवर पॉईंट' स्वरुपातच प्रयोग म्हणून देत आहोत. - संपादक*

**चौकट १**

**भारत : उर्जा स्रोत-सद्य:स्थिती**

| | |
|---|---|
| लोकसंख्या | - १०० कोटींच्या वर सर्वाधिक लोकसंख्येचा जगातील दोन क्रमांकाचा देश |
| वाहन संख्या | - १ कोटीच्या घरात |
| इंधन | - पेट्रोलियम |
| आयात | - ७४% (२६% आत्मनिर्भर) |
| प्रश्न | - जागतिक स्तरावर वाढत जाणारी पेट्रोलियमची किंमत पारंपारिक स्रोत कमी होत चालले आहेत. |



**चौकट २**

**अधिक उर्जा निर्माण होण्याची गरज**

- उर्जेची मागणी प्रतिवर्षी १०% ने वाढत आहे.
- आर्थिक व सामाजिक विकासासाठी विपुल उर्जा निर्णायक ठरणार आहे.
- नागरीकरण, औद्योगिक वाढ, बदलती आरामदायी जीवनशैली यामुळे उर्जेचा वापर वाढता आहे.
- गेल्या दोन दशकात प्रतिवर्षी वाढ ४-६%
- भारत जगाच्या प्रमाणात १% उर्जा निर्माण करतो.
- इतर देशांकडे निर्मिती क्षमतेच्या अनेक शक्यता आहेत. बहुतेक देश पारंपारिक स्रोतांचा वापर करण्यावर भर देतात, जो कमी होण्याच्या मार्गावर आहे.
- निर्मिती क्षमतांमध्ये उपयोगाच्या तुलनेत नाममात्र वाढ आहे.
- पारंपारिक स्रोतांचा वापर कमी करुन अधिक स्वच्छ पर्यायी स्त्रोत वापरण्यासाठी धोरणे विकसित होत आहेत.

### चौकट ३

**भारत**

- आधुनिक जीवनशैली वापरण्याच्या दृष्टीने ५०% हून अधिक घरांना वीजपुरवठा नाही.
- स्वयपाकासाठी लागणारे सोयिस्कर, स्वच्छ इंधन बहुतेक घरांना उपलब्ध नाही.
- वापरले जाणारे उर्जा स्रोत-लाकूड, कृषि उद्योगातून मागे उरणारे स्त्रोत, गोवऱ्या इ. याचा घरातील प्रदूषण निर्माण होण्यावर परिणाम होतो.
- घरातील प्रदूषणाचा परिणाम श्वसनाचे विकार होण्यात होतो. यास प्रामुख्याने महिला व मुले बळी पडतात.
- उर्जा/विद्युत क्षेत्रात कायम कमतरता आहे.

### चौकट ४

**वाहतुकीस लागणारे इंधन**

- पेट्रोलियमजन्य उत्पादनांची मागणी भारतात वाढली आहे.
- तेल व नैसर्गिक वायुंचा साठा आणखी काहीच दशके पुरेल एवढा शिल्लक आहे.
- कोळशाच्या खाणी दोन शतके टिकतील याची शक्यता आहे पण त्यातून कार्बन अधिक निर्माण होतो व त्याची दाहकता कमी असते.
- पारंपरिक युरेनियम अणुभट्टीतून येती पाच दशके १०,००० मेगॅवॅट उर्जा निर्माण होईल.

### चौकट ५

**भारत : वीज-सद्य:स्थिती**

- गेल्या पाच वर्षात मागणी ७०% वाढ (कमाल) झाल्याचा अनुभव आहे तर विद्यमान उर्जा केंद्रांच्या निर्मितीत नाममात्र वाढ आहे.


**परिणामत:**

- दिवसाला १ ते ६ तास भारनियम
- उद्योग क्षेत्रे व सातत्याने वीज वापर असणाऱ्या प्रकल्पांवर परिणाम
- उत्पादन व नफा यावर परिणाम
- वीज भारनियमनाच्या काळात माणसे नुसती बसून रहातात.
- नजिकच्या भविष्यात अनिश्चितता रहाण्याची चिन्हे

### चौकट ६

**भार नियम**

मागणी व पुरवठा : भारतातील नजिकच्या काळातील अंदाज (G.W.)




| | 2001/02 | 2006/07 | 2011/12 |
|---|---|---|---|
| Peak Load | 95.76 | 130.94 | 176.65 |
| Installed Capacity | 126.04 | 181.1 | 242 |
| Peaking Capability | 88.92 | 129.82 | 146.67 |

-○- कमाल भार

-□ - विद्यमान क्षमता

-△- कमाल क्षमता

**चौकट ७**

**पारंपरिक इंधन स्रोतांपासून उर्जा निर्मिती**

परिणाम

- स्थानिक वातावरणात COx, NOx व इतर घनकणांचे उत्सर्जन
- रसायनमिश्रित वर्षा, अस्पष्ट वातावरण, गंज इ.
- ग्लोबल वॉर्मिंग पृथ्वीच्या तापमानात वाढ
- सुपीक जमिनींचे वाळवंटीकरण

**चौकट ८**

**भारतीय उर्जा : पर्याय**

पारंपारिक इंधन

- कोळसा
- कोळसा जन्य विद्युत, औद्योगिक उपयोजन,
- लाकडी कोळसा/लाकूड
- अप्रक्रिया केलेली तेले
  - रॉकेल, पेट्रोल, डिझेल, टार, एल.पी.जी. गॅस.
  - सी.एन्.जी, एल्.एन्.जी.
  - न्युक्लिअर गॅस
  - जलवायु

**चौकट ९**

**पुनर्वापरकरता येऊ शकणारे इंधन पर्याय**

- अपारंपरिक इंधन
  - सौर
  - विद्युतघटचलित वाहने
  - पवन शक्ती
  - जैव शक्ती
  - भूऔष्णिक शक्ती
  - लाटांची शक्ती
  - सामुद्री औष्णिक शक्ती रुपांतरण
  - जलवायु शक्ती

**चौकट १०**

| विद्यमान विद्युत निर्मिती स्थिती | |
|---|---|
| औष्णिक | ७०% |
| जलविद्युत | २४% |
| न्युक्लिअर | २.५% |
| पुनर्वापर योग्य संसाधने | ३.५ % |

**चौकट ११**

**उर्जा - मागणी**

उर्जा मागणी:
- गृहोपयोगी उपयोजन
- औद्योगिक उपयोजन
- वहातुक
- विद्युत निर्मिती
- कृषि


### चौकट १२

**इंधन : स्थिती**

भारत : नैसर्गिक वायु मागणी व पुरवठा
(मिलीयन क्युबिल मिटर प्रतिक्रिया)
वाहनासाठी इंधन - महाग, वहातुकीची किंमत वाढविणारे वाढते प्रदुषण, दाट वस्तीत वहातुकीची कोंडी होते त्यावेळी धोक्याची पातळी ओलांडली जाते.

### चौकट १३

IPE Brent Crude Oil Closing Price (bagin July 1988)




Average monthly data from July 1988 through December 2005

### चौकट १४

**अपारंपरिक उर्जा स्रोत मंत्रालयाचे प्रयत्न**

- सौर चूल व सौर कंदील यांच्या उपलब्धतेसाठी सौर प्रकल्प
- जैव वायु प्रकल्प
- खेड्यांसाठी कमी क्षमतेचे छोटे विद्युत उर्जा प्रमाण

### चौकट १५

**पुढे चालू**

- जलवायू उर्जेसाठी पुढाकार
- नियोजन मंडळाने जलवायु उर्जेसाठी स्वतंत्र गटाची योजना केली.
- या गटाची कार्ये

निर्मिती, साठा, वाहतुक, सुरक्षा व संबंधित नियम, उपयोजन यांची त्वरित पहाणी.

### चौकट १६

**लक्षणीय अशा इतर बाबी**

- राष्ट्रीय जलवायु मंडळाचे गठन
- जलवायु तंत्रज्ञानांतील संशोधन व विकास कार्यांचे सबबीकरण
- जलवायु तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकांची आखणी
- या क्षेत्रातील नावाजलेल्या संस्थांना कल्पकता व आर्थिक मदतीसाठी सहकार्य करणे.


**चौकट १७**

**पुढे चालू ...**

- चेन्नई येथील आय्.आय्.टी.ने जलवायु साठा संशोधन या विषयास सहाय्य करण्याचे स्वीकारले.
- खरगपूर आयआयटीने काँप्रेसर चलित धातू हायड्राइड उष्ण व शीतकरण पद्धती वापरली.
- दिल्ली आय्. आय् .टी. ने जलवायु व डिझेल असे द्विचलित इंजिन विभाजित केले.
- हैद्राबाद आय्.आय्.सी.टी. ने जैव जलवायु उपयोजन केले.
- जाधवपूर विद्यापीठाने जलवायुचा कृषि अभियांत्रिकी इंधन म्हणून वापर केला.
- हैद्राबाद येथील 'भेल' (Bhel) ने इंधन घट उर्जा संच बनविल.

**चौकट १८**

**भारतीय प्रयत्न**




जलवायु चलित तीनचाकी वाहने व रेषा मोटारी या मोटारींमध्ये इंधन घट बसविले आहेत. विज्ञान भवन, दिल्ली येथे २६ जाने. २००४ रोजी त्यांची प्रात्याक्षिके सादर केली गेली.

**चौकट १९**

**बनारस हिंदू विद्यापीठ**

जलवायु उर्जेसाठी मेटल हायड्राइरस, संशोधन उत्पादन व त्याचे उपयोजन



**चौकट २०**

**जलवायु उर्जेचे फायदे**

- स्वच्छ व पुनर्वापरास योग्य असा उर्जा स्त्रोत
- घातक प्रदुषके कमी करुन आरोग्य व पर्यावरणास उत्तेजन
- येणाऱ्या काळात जलवायु तंत्रज्ञान हे परिपक्व तंत्रज्ञान असेल
- आता ही गुंतागुंतीचे तंत्रज्ञान आहे, महाग आहे पण येणाऱ्या काळात फायदेशीर ठरणार आहे.

**चौकट २१**

**पुढे चालू ...**

- भविष्यात वीजेप्रमाणेच जलवायु ही महत्त्वाची वाहक व पुनर्वापर करता येईल अशा सौर, पवन व जीवसंहती उर्जा स्रोतांपासून मिळणारी उर्जा ठरेल.
- उर्जा निर्मितीची मोठी यंत्रणा नसलेल्या पण उर्जेची सातत्याने वाढती मागणी असणाऱ्या भारतासारख्या विकसनशील देशांसाठी जलवायु उर्जा हा आकर्षक पर्याय ठरेल की ज्यामुळे आजचा उर्जेचा तुटवडा जाणवणार नाही.

**चौकट २२**

**समारोप**

- योग्य अशा तंत्रज्ञान वापरामुळे जलवायु ही उपयुक्त पर्यायी पद्धत ठरेल.
- पाण्याचे विद्युतविच्छेदन करून हायड्रोजन व प्राणवायु आणि पुनर्वापर योग्य वीज मिळण्यात रुपांतरण शक्य ठरेल.
- हायड्रोजनचा उर्जावाहक व इंधन म्हणून वापर शक्य होईल वहातुकीत सुरक्षितता आणता येईल.
- हायड्रोजन हे
  - बिनविषारी
  - पुनर्वापरयोग्य
  - पुनर्निर्मिती योग्य
  - स्वच्छ
  - इंधन घटात उपयुक्त
  - प्रतिक्रियात्मक इंजिन

  आहे
- आज याच्या नियोजनाची, संयोजनाची, साक्षरता प्रसाराची, तंत्रज्ञान विकासाची व संशोधन विकास प्रकल्पात गुंतवणुकीची गरज आहे.

**जलवायु उर्जा - भारतातील इंधन आणीबाणीवरील भविष्यातील उपाजयोजना**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने मध्यतंरी ''पर्यायी उर्जा स्रोत'' या विषयावर एक परिषद आयोजित केली होती. त्यानिमित्ताने जलवायु उर्जा याविषयी माझे कुतुहल जागे झाले. आपल्या देशाच्या उर्जेबाबत असलेल्या आणीबाणीसाठी ही पर्यायी योजना अतिशय उपयुक्त आहे.

फेडरल एजन्सी फॉर सायन्स अँड इनोव्हेशन ऑफ दि रशियन फेडरेशन आणि रशियन चेअरमनशिप तर्फे ६ ते १० फेब्रुवारी २००६ रोजी मॉस्को इथे एक आंतराराष्ट्रीय परिषद 'हायड्रोजन टेक्नॉलॉजिस फॅर एनर्जी प्रॉडक्शन' या विषयावर आयोजित केली होती. या परिषदेसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांना आपाला शोधनिबंध सादर करण्यासाठी आमंत्रण होते.

**प्राचार्य डी. के. नायक**

(अनुवाद - प्रा. मोहन पाठक)

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना


*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा दहावा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती. या लेखमालेवरील प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यांत. - संपादक*

**विश्वनिर्मितीत मानवी उन्नति**

भारतीय संस्कृतीची धारणा व ध्येये व उद्दिष्टे ही मानवी अहंकाराने भारलेली नाहीत. विश्वाच्या निर्मितीमध्ये जी योजना आहे त्या योजनेतच मानवाचा जन्म आहे व उन्नति आहे. ह्या योजनेच्या, प्रचंड, प्रसारात एकवाक्यता आहे, परस्परपूरक असा उन्नतीचा मार्ग आहे, हा विश्वास आहे.

**आत्मज्ञान व स्वरुप**

## The Unmanifest Absolute




A = Unmanifest Absolute
B = Manifest Absolute
C= Noetic Absolute
D = Finite Existence

**चित्र नं. १**

ह्या उन्नतिच्या योजनेत 'मानवी स्वरुप' व स्थान वस्तुत: कोणत्या पातळीवर उभे आहे, ह्याचा पत्ता 'या संस्कृतीने' जाणला आहे. 'unmanifest Absolute' चित्र नं. १ पहा. मानवी देहात असलेले 'चैतन्य स्वरुप' हे त्या खऱ्या वैश्विक मानवाचे खरे स्वरुप व अस्तित्व आहे. कोणी हे असे जाणलेले दिसते ? अलीकडच्या काळांत 'पावसच्या' स्वामींचे नाव 'स्वामी स्वरुपानंद' असेच कां असावे ?

**वैदिक ऋषींचे शोध, सांप्रदायिक अर्थ, एकात्म साधना**

अनेक राजकीय सामाजिक बदलातून हा भारतीय समाज जात असला तरीही वसिष्ठ, वाल्मिकी, विश्वामित्र, नारायण ऋषि, अथर्वण ऋषी, वामदेव ऋषी व अनेक वैदिक ऋषींनी जे ह्या खऱ्या स्वरुपाचे शोध लावले व रामकृष्ण, रमण महर्षी वगैरेंनी ज्या साधनांच्या मार्फत ह्या स्वरुपाचा उन्नतिमार्ग ''याची देही, याची डोळां'' साध्य केला, त्या प्रयत्नांच्या व सिद्धिच्या यशाबद्दल, दिशेबद्दल, खात्री पटलेली ही संस्कृती आहे. तेव्हां या मार्गावर भौतिक पातळीवर असलेल्या मर्त्य अस्तित्वाला दिव्य जीवनाचा मार्ग म्हणजे, पशूतून पाशूपताच्या (शैव-दर्शनावर जाण्याचा, 'पुरुषोत्तम स्थितीच्या' प्रगतिचा, गीतेचा मार्ग) हा उन्नतिचा खरा सोपान, हे माहीती आहे. 'ॲनिमल काँशसनेसला' 'डिव्हाईन लाईफ' वर नेण्याचा महायोगी अरविंद घोष यांचा अर्थ व मार्ग माहीत आहे. शिवाय, ही

उन्नति चराचराला प्राप्त व्हावी हा इरादा व आवाका आहे.

**संस्कृती व साधना तंत्रे सकात्मता**

पण, आपल्या या लेखाचा उद्देश हा आहे कीं, या ''जगावेगळ्या'' मार्गावर कोणती साधने, तंत्र, यंत्र, योगसाधना वगैरे ह्या संस्कृतिने मिळवल्या, जतन केल्या, वृद्धिंगत केल्या ? अगदी तपशीलवार नव्हे पण सूक्ष्मपद्धतीने आपण मागील कांही लेखात 'दिशा' मासिकातून, ह्याचा शोध मांडण्याचा प्रयत्न केला. 'उपनयन' ह्या संस्काराचा आशय ह्या पार्श्वभूमीवर बघितला आहे.

अशी अनेक साधने व उपाय आपण यथावकाश बघणार आहोतच. पण, सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा कीं ह्या प्रत्येक साधनेचे निरनिराळे 'संप्रदाय' बांधले गेले. त्या वेगवेगळ्या संप्रदायातील साधनांमध्ये दुर्दैवाने एकांगीपणा आला. अभिनिवेश आला. मूळ उद्दिष्टांची, ध्येयांची एकात्मता व एकवाक्यता मांडली गेली नाही-समजली गेली नाही. परस्परांमध्ये मानवी गुणदोषांच्या प्रभावाने-दोषांनी सांप्रदायिकते मध्ये संकुचितपणा, संघर्ष व मूळ शक्तींचा ऱ्हास, अपभ्रंश व दर्शनी कर्मकांडेच राहिली. 'Organisation Theory' मधील आशयाप्रमाणे मूळ साधनांची (आध्यात्मिक उंची) कमी कमी होत फक्त Ruthal त्यौहार, समारंभ, चालीरिती अश्या भौतिकी स्वरुपात 'अस्थिंचे सांगाडे' 'skeletons' शिल्लक राहिले. ह्या साधनेत अंतर्भूत असलेले गुप्त, रहस्यात्मक 'आंतरिक चालना' नष्ट झाल्या, आणि आज त्यांची जाणीव, माहिती व आवश्यकतेचा मागमूसही शिल्लक राहिला नाही. मग संस्कृतिची वाटचाल कशी चालू रहाणार हा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे !!

भारतीय संस्कृतिवर ही एक मागासलेली रानटी संस्कृति आहे, असे आरोप 'ब्रिटीश राजसत्ता' करीत असे व भारताचा व ह्या भूमीवरील संस्कृतिचा परिचय पाश्चात्य जगाला 'इंग्रजी' ह्या भाषेच्या मार्फतच बहूतांशी झाला. ह्यामुळे संबंध मानवजातीला अभिमान वाटेल अशी मानवी शरीर व विश्वरचना ह्यांची रहस्ये सांस्कृतिक उंची वाढवण्याकरिता कशी हस्तगत केली व वापरली गेली, त्याची अजिबात माहिती नाही.

अशाच एका रहस्याची माहिती आपण ह्या लेखात करणार आहोत.

ही आहे **'श्री विद्या'** व तिच्या साधनेचा अत्यंत गूढ असा 'प्लॅन' (नकाशा किंवा चित्र आधार) व त्यावर आधारलेली तंत्र साधना.

मी ही तंत्रसाधना सर्वांगाने ह्या लेखात सांगणार नाही, कारण ते अशक्यच आहे. पण, ज्या भाषेत पाश्चात्य भोगवादी संस्कृतित वाढलेल्या व रमणाऱ्या समाजाला ह्या खऱ्याखुऱ्या 'आध्यात्मिक साधनेचा' थोडासा परिचय होऊ शकेल, अशा भाषेचा वापर करणार आहे.

मानवी शरीर व त्यांत असलेल्या चैतन्य शक्तिला थोड्या स्थूलपणे 'पिंड' असे म्हणले जाते, तर ह्या विश्वचक्रातील महाचैतन्यशक्ति व तिच्या स्वरुपाला 'ब्रह्मांड' म्हणून संबोधण्यात येते.


**श्रीविद्या व श्रीयंत्र**

भारताचा मोठा शोध म्हणजे ह्या दोन्ही विश्वचक्र व मानवी स्वरुपात एक अभिन्न असे **'चैतन्यऐक्य'** आहे.

'पिंडी ते ब्रह्मांडी'' हे ते तत्त्व

विश्वचक्रातील 'महाशक्ति' जिच्या योगाने हा विश्वसंभार-तारे, ग्रह, चंद्र, सूर्य, पृथ्वी व प्राणीमात्र, वनस्पती व मानव निर्माण झाले, त्याच शक्तिचा एक अंश 'कुंडलिनी' ह्या नावाने परिचित असा मानवी देहात सुध्दा अस्तित्वात असतो - पण निद्रिस्त अवस्थेत !!

त्या अवस्थेतून ह्या शक्तिला जागृत करण्याची साधना ही 'श्रीयंत्र साधना' होय. यंत्राचे चित्र व श्लोक वाचा, पहा यंत्र म्हणजे काय ?



चित्र नं. २

बिन्दुत्रिकोणवसुकोणदशारयुग्ममन्वश्रनागदलसंयुतषोडशारम्।
वृत्तत्रयं च धरणीसदनत्रयं च श्रीचक्रमेतदुदितं परदेवतायाः॥
अरूणां करूणातरङ्गिताक्षीं धृतपाशांकुशपुष्पबाणाचापाम्।
अणिमादिभिरावृतां मयूखैरहमित्येव विभावये महेशीम्॥

चित्र नं. ३

"The Sanskrit word "Yantra" derives from the root "Yam" meaning to Sustain, hold, the energy inherent in a particular element, object or concept. In its first meaning "yantra" may refer to any kind of mechanical contrivance, which is harnessed to aid an enterprise. A Yantra in this Sense, therefore, is any sort of machine or instrument such as is used in architecture, astronomy, alchemy, chemistry, warfare or recreation.

The meaning of the term **Yantra** has been expanded to refer to **religions enterprise,** and has acquired a special **theological significance.** Mystic Yantras are aids to and the chief of instruments of **meditative discipline.** Basically a Yantra used in this context and for this purpose is an abstract geometrical design intended as a 'tool' for meditation and increased awareness.

Man's spiritual journey from the stage of material existence to ultimate enlightenment is mapped on the greatest of Yantras, the "SRI YANTRA."

हा परिचय जास्त जवळचा वाटला ना ? 'यंत्र' हा शब्द ''नैसर्गिकपणे'' (पाश्चात्य संस्कृति) मशीन, युद्ध, रसायनशास्त्र ह्यांच्याशी निगडीत असताना व हे गृहीत धरले असताना, हे इंग्रजी भाष्य असेही सांगते की, भारतीय संस्कृतीत त्याला 'धार्मिक अर्थ' लाभला आहे. 'जाणीव' (awareness) वाढवण्यासाठी असलेला हा साधनेचा नकाशा होय - (भूमितीशास्त्रातील (Geometry) मग, 'यंत्र' ह्या संकल्पनेचा भौतिकवादात कोणता अर्थ व अध्यात्मशास्त्रात कोणता ? फरक कोणता ?

ही टीका अशासांठी कीं या यंत्राची रचना, भाषा, रेखाशास्त्र, संकल्पना एवढ्या गूढ आहेत कीं ह्या सर्व 'भौतिक विज्ञानाला झेपणाऱ्या नव्हेत.'

**साधना धोरण**

ह्या साधनेत 'दिशेचे भान', प्रतिकांचे अर्थ व निरनिराळ्या पातळीवरची साधना, ध्यान धारणा अभिप्रेत आहे. ही साधना दोन पद्धतीने करता येते - म्हणजे ही एक 'निर्णय संधि' आहे. एक 'वामाचारी' मार्गाने - संहार क्रमाने व दूसरी 'समयाचारी मार्गाने - सृष्टिक्रमाने. त्यांतील वामाचारी व चार पुरुषार्थातील 'अर्थ व काम' ह्या प्राप्तिसाठी तर 'समयाचारी' ही 'धर्म व मोक्ष' प्राप्तिसाठी होय. भारतीय संस्कृतिमध्ये ह्या दोन शक्यता असूनही 'वामाचारी' पद्धतीने 'शक्तिजागृति व वापर' हा धोक्याचा मार्ग समजला आहे.


**श्रीयन्त्र - दिव्यत्व**



**अष्टचक**

**चित्र नं. - ४**


**एकैव सा - महाशक्ति : -**
**तया - सर्वमिदंततम् ।।**



**श्रीविद्या**

**चित्र नं. - ५**

Madhya Trikona Astamavaranam




*Nada Prakrutic, Guna Traya Pradhan Tri Shakti Rupa*

**चित्र नं. -६**

ज्याप्रमाणे, ॲटॉमिक एनर्जी ही 'अमेरिका, रशिया, चीन, पाकिस्तान वगैरे भौतिकवादी राजसत्तेसाठी, आर्थिक सत्तेसाठी वापरण्यास उद्युक्त आहेत, तर 'भारत', ही शक्ति शांततेसाठी वापरण्याची इच्छा बाळगत आहे. हा फरक मानवी पिंडाची, वृत्तीची मार्ग पेलण्याची समर्थता, क्षमता ह्या अधिकारावर अवलंबून आहे.

तेव्हां भारतीय संस्कृतीच्या 'आध्यात्मिक' (Spiritual consciousness evolution) ह्या उद्दिष्टाला बांधलेले हे 'श्री यंत्र' व 'श्री विद्या' हे साधन कुठल्या प्रकारे स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्वरुप दाखवते ? मुख्य म्हणजे शुद्ध शरीर, शुद्ध बुद्धी, व मनाची सूक्ष्म एकाग्रता, आणि सर्वात मुख्य म्हणजे, स्वत:च्या 'मर्त्य शरीराच्या' जीवनाबाहेर दिव्य जीवन शोधण्याची दुर्दम्य इच्छा, आकांक्षा ह्या बळावर ही अंतरंगातील साधना अवलंबून आहे . तिचा 'श्री यंत्र' हा अपूर्व 'नकाशा' आहे. प्रत्येक प्रवेशद्वारावर, मंडलावर जे 'मंत्र आहेत ते एक प्रकारचे 'Sound Lock' 'नाद कुलूप' आहे. त्यांतील मंत्रसाधना देखील विवक्षित पद्धतीने म्हणजे प्रदक्षिणा - clockwise आणि Anticlockwise ह्या

प्रकारांनी आवश्यक आहे. हा नकाशा चौकोन, त्रिकोण व वर्तुळ ह्या तीन भूमीती (Eucledian Geometry) ह्या बैठकीवर आहे. 'चौकोन' ह्याच्या सांकेतिक व प्रतिकात्मक अर्थ 'जड' शरीर- हे लक्ष आहे.

'वर्तुळ' हे मानसिक स्तरावरच्या साधनेचे लक्ष व चित्रमय मार्गदर्शन आहे.

त्रिकोण हे शक्तिचे प्रतिकात्मक सूत्र व दिशा (उर्ध्व व अधोगत) अश्या तऱ्हेचे सूचक चित्र आहे. शिवाय 'आत्म्याच्या स्तरावर जे 'तीन पाश' आहेत ते त्रिकोण व अंतिम साध्य 'बिंदू' ह्या चित्राने दाखविले आहे. पाशशक्ति, धनुशक्ति व बाणशक्ति अशी त्याची तीन नांवे आहेत. कल्पना करा की देहाच्या पलीकडे वैश्विक अस्तित्त्व असणाऱ्या व पृथ्वीच्या जड व्यवहारावरच्या स्तरावर गती असणाऱ्या ह्या 'आत्म्याच्यावरती कोणते पाश आहेत, त्याची जाण, कल्पना व त्यातून मुक्त होण्याच्या विलक्षण महत्वाकांक्षेने ही साधना केली जाते. शरीरातंर्गत असलेल्या 'महाशक्तीच्या उपयोगाने व मनाच्या एकाग्रतेने, निष्ठेने व विश्वासाने !! (चित्र नं. ४,५,६ पहा)

उगाच नाही स्वामी विवेकानंद मानवाला उद्देशून म्हणाले होते कीं ''Be Lions !'' 'सिंहासारखे शूर व्हा'.


## क्षणभंगूर भोगाचे सुखासीन गुलाम

पण, ह्या जगाच्या भोगवस्तूच्या व भौतिक दर्शनी सुखदु:खांच्या जाळ्यांत गुंतलेल्या मानवाला ह्या 'भोगाचे गुलाम' होऊन कांही काळ जगण्यातच स्वारस्थ वाटते हे दुर्दैवाचे, अज्ञानाचे लक्षण आहे. त्याला भारतीय संस्कृतीने शोधून काढलेल्या उत्तराचे, साधनेचे, प्रयत्नांचे खरे कौतुक वाटत नाही हे खरे खेदाचे स्वरुप आहे. महायोगी अरविंद व 'मदर' ह्यांच्या शेवटच्या वर्षातील साधनेचे वर्णन व स्वरुप जाणल्यावर ह्या 'मानवी प्रयत्नांची' खरी जाणीव होते व सामान्य माणूस, विद्वान, राजकारणी ही मंडळी कुठल्या 'क्षणिक जीवनाच्या गुंतावळ्यात आपल्याला अडकवित आहेत, त्याची जाणीव होते. मानवाला ह्या युगानुयुगे चालणाऱ्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर व त्यागाच्या डोंगराएव्हढ्या ढिगावर स्वत:चे वैयक्तिक स्वार्थ व मर्त्य जीवनाची तात्कालिक भूलभुलावण खरी मानून, आपल्या व्यवहारवादी, भौतिक उद्दिष्टांचे कौतुक करणाऱ्या ह्या राजकारणी मंडळींनी ह्या 'वैश्विक लढ्याला' एका क्षुद्र, प्राणीस्तरावरील जीवनाच्या पातळीवर आणून ठेवले, ह्याची खरी जाणीव होते. ह्याचा अर्थ हा नव्हे कीं हे भौतिक मर्त्य जीवन क्षुद्र आहे. हे भौतिक जीवन जीवाला 'दिव्य जीवन' जगण्यासाठी एक आवश्यक साधनेची प्रयोगशाळा आहे.

अध्यात्मवादीत ह्या जीवनाला 'माया' संबोधून ह्या जीवनापासून पलायन सुचविणारे 'अध्यात्म दर्शन' देतात ते चुकीचेच आहे. हे जग दु:खमय आहे व म्हणून शून्याकडे प्रवास असा निष्कर्ष काढणे, हाही चुकीचाच अर्थ आहे.

## वैदिक आव्हान

उलट, खरा वैदिक व तांत्रिक अर्थ ह्या पृथ्वीवरील जीवनाला एका 'अपूर्व संधीचे' स्थान देतो, आणि, सगळ्या वैश्विक शश्मिला व स्वरुपाला देखील कौतुक वाटेल अशी प्रयत्नांची शिकस्त करण्याची दिशा दाखवितो.




चित्र नं. - ७

हे आहे 'श्री यंत्र' व 'श्री विद्येच्या' साधनेचे खरे अर्थ व स्वरुप !!

ह्या साधनेमध्ये काय काय साधने लागतात. Multi-disciplinary approach अनेक संप्रदाय, योग, तंत्र, मंत्र ह्यांची 'एकात्म साधना' इथे अभिप्रेत आहे. ह्या साधनेच्या वर्णनावरुन एक गोष्ट जाणवते कीं ही 'साधना सर्वसामान्य माणसाला सोपी व उपलब्ध करणाऱ्या ऋषीमुनीं व तांत्रिकांनी, व योग्यांनी ही 'साधनेतील-उद्दिष्टे' नक्कीच पार केली असावीत. आणि त्यांनी ह्या साधनेची Complexity गुंतागुंत ज्या युक्ती व योजनेमार्फत सामान्य माणसापर्यंत आणून ठेवली त्याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. शिवाय, मानवी शरीर, चैतन्य, मानस, अंतरंग व त्यांचे विश्वसंबंध, नाती ह्यांची पुरेपुर जाणीव व ज्ञान असल्याशिवाय ही गोष्ट अशक्य आहे. Science Fiction विज्ञानकथेमध्ये देखील कल्पनाशक्तीची एवढी झेप 'ॲसिमोव्ह', ऑर्थरी सी क्लार्क वगैरे वैज्ञानिकांना झेपणार नाही, मग साधनेच्या सत्यतेबद्दलची खात्री देणारे ते ऋषी व आध्यात्मिक गुरु किती सात्विकतेने, निरलसतेने, निर्व्याज मनाने ही देणगी 'भारतीय संस्कृतीमध्ये' ठेवून गेले आहेत त्याची थोडी कल्पना यावी. (चित्र नं. ७)

**आत्मपाशाचे रज्जू, मुक्तता**

ह्या साधनेतील बारकावे एवढे अनंत आहेत कीं सामान्य माणसांना त्याची स्मृती ठेवणे व भान ठेवणे अत्यंत कठिण आहे. पण, ज्या योजनेने 'विश्वनिर्मितीच्या क्रियेने' मानवी शरीरांत बद्ध झालेले हे चैतन्य ह्या पृथ्वीवर एका विवक्षित जीवनकार्यासाठी अवतरले, त्या मानवी यंत्राची बांधणी कुठल्या रज्जूंनी, पाशांनी बद्ध झाली त्याचे स्वरुप ह्या चित्रांवरुन लक्षात यावे.

ह्या 'मानवी शरीराच्या' कोश्याची बांधणी ज्या कुशलतेने व बारकाईने ह्या विश्वांत घडली आहे तिला दंड थोपटून-हे कोडे उलगडून मानवाला एका दैवी स्तरावर नेण्याचा चंग व आव्हान ह्या भारतीय संस्कृतीने अंगिकारिले आहे. त्यांत वैचारिक गोंधळ नाही - भोग व इतर मोहाच्या सांपळ्यात न अडकता एक चित्ताने आव्हान देण्याची विजीवृत्ती दिसेल.

थोडा थांबून विचार करा कीं हे विलक्षण आव्हान पेलायला जी प्रज्ञा व साधने लागतात व ज्या निरनिराळ्या disciplines वैचारिक दर्शनाची बांधणी करावी लागते ती तुलनेने इतर जागतिक संस्कृत्यांमध्ये आहे कां ?

**''भौतिक विज्ञानाचा पॅरेडिम व अहंकार**

सध्याच्या 'भौतिक विज्ञानाच्या' पॅरेडिममध्ये ही कुवत व निदान धडपडीची योग्य दिशा तरी दिसते कां ?

पण, पाश्चात्य संस्कृतिमध्ये थोडेसे Mystic चमत्कार, गुढवादी असे जे विद्वान सांप्रदायिक आहेत, त्यांचे विचार बघु या. थोडेसे आपल्या 'दर्शनांच्या' जवळ आलेले दिसतील.

''Mapping consciousness simply means establishing references in your inner landscape. Through mapping the unconscious, it becomes conscious.

Mapping consciousness requires a strict methodology - a methodology that is scientific in essence. But, unlike present trends of scientific research, where the scientist and his object are separate, there the object and the subject are separate, here <u>the object and the subject are one.</u> Your bodies - physical and subtle are the laboratory. Here, knowledge is self knowledge, in a harmonious marriage of intuition and critical discernment.''

मी पाश्चात्य भौतिक संस्कृतिबद्दल दिशाहिनतेचा आरोप केला - त्याच तऱ्हेचे विचार खाली मांडलेले दिसतील.

''Make no mistake : with the advent of genetic engineering, virtual reality, nano technology and artificial intelligence, humanity is on the edge of a momentous metamorphosis. It will happen very fast. And if guided only by materialistic. Views, it could result in complete disasters.

What I would like to see is not a slowing down of the pace of scientific discoveries, but a greater integration of science and spirituality.''

मग, वरील परिच्छेदांत जी नवीन शोधांची नावे आली - उदाहरणार्थ 'जेनेटिक इंजिनीरींग, व्हर्च्युअल रिॲलिटी, नॅनो टेक्नॉलॉजी आणि आर्टिफिशियल इंटलिजन्स - ही तंत्रे कांही दिशा दाखवितात त्या व 'श्रीयंत्र, गायत्री मंत्र, भारतीय उपनयन, विवाह संस्कार, वगैरे मध्ये काय फरक आहे ?

आपल्या असे लक्षात येईल कीं निसर्गाने दिलेल्या मूळ पदार्थावर आधारलेल्या 'दिशाहीन' शोधांवर भर दिला आहे. त्यात 'विश्वामित्री' अहंकार भरलेला दिसेल. निसर्गाने जी 'मेंढी' निर्माण केली तिच्यात एका भागावर क्लोनिंग करुन एक आणखी डॉली मेंढी निर्माण केली व ती कमी आयुष्याची निघाली, तिची वृद्धापकाळाकडे जलद अधोगती झाली व तिला नंतर मारून टाकण्यात आले. स्वत:च्या खेळापायी एका अजाण मेंढीचा जीव घेतला. कां ? विश्वनिर्मात्याकडे काय तक्रार आहे ? जेनेटिक इंजिनीयरिंग मध्ये 'माणूस' (कृत्रिम) करावयाचा कीं नाही - ह्याबद्दल वाद होतो आहे. ह्या नवीन मानवाची जबाबदारी पेलण्याची 'नैतिकता व विवेक' हा समाजाला झेपेल की नाही, अश्या शंकात, संशयात व संभ्रमात हा समाज ढकलला आहे, सापडला आहे - पण तरीही आंधळ्या 'दिशाहीन' संशोधनाचा मोह पडला आहे ह्या भौतिकवादी शास्त्रज्ञांना.

## श्रीमद् भागवत किस्सा

पण, श्रीमद भागवतातील किस्सा ऐका. ब्रह्मदेवाच्या सृष्टीनिर्मितीच्या 'यज्ञात' अनेक प्राणी निर्माण करुनही समाधान झाले नाही, पण, जेव्हा 'मानव' हा 'फॉर्म' निर्माण झाला, तेव्हा ब्रह्मदेवाला समाधान वाटले. कां-कां ? तर, ह्या मानवाला 'ब्रह्मज्ञान' होऊं शकेल ह्याचा विश्वास पटला म्हणून. केव्हढे हे औदार्य व नैतिकता !! काय असेल त्यांतील हेतू व उद्दिष्ट?

## विज्ञानाचा विनियोग

'आर्टिफिशियल इंटलिजन्स' ची उडी कुठपर्यंत? मानवाच्या बुद्धीच्या, नैतिकतेच्या व जीवनदृष्टीकोनाच्या व्यावहारिक मर्यादेबाहेर हा प्रयोग जाणार नाही. नवीन जीवन मूल्ये हे यंत्रबुद्धी निर्माण करु शकणार नाहीत, तशी आकांक्षा वा इच्छासुद्धा ह्या प्रयोगामागे नाही. 'नॅनो' हे अव्यक्त (unmanifest) जगाएव्हढे सुक्ष्म होणार नाही.

आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या सर्व शोधांचा उपयोग 'युद्ध, संहार व सत्ता व स्वार्थ' ह्यासाठीच होणार हे उघड आहे. किंवा ही शक्ती हातांत आल्यावर ॲटमबॉम्ब, हैड्रोजनबॉम्ब सारखी भयानक संहारी अस्त्रे हाती आल्यावर, त्यावर कुणाचा अधिकार राहील ह्यावर 'सुंदोपसुंदी' व वादंग, चिंता व खेळ राहील. त्यामुळे 'शक्तिचा' शोध चालू आहे ; नैतिक मूल्यांचा, शहाणपणाचा, विवेकाचा नाही !!

## शक्ती, अधिकार व नैतिकता

मग, ह्या तुलनेने 'श्री यंत्र वा श्री विद्या' ह्या साधनेने ज्या 'कुंडलिनी-महाशक्तीचाच अंश असलेल्या शक्तीचा अधिकार मिळेल-त्या साधनेतच आगाऊच नैतिकतेचा आग्रह व विवेक सामावलेला आहे, अंतर्भूत आहे हा नैतिक अधिकार कमावल्याखेरीज मुळातच ही शक्ती प्रसवणारच नाही, अशी निसर्ग योजना - किंवा दैवी योजना आहे.

त्यामुळे शक्ती व नैतिकता व विवेक यांच्या ‘साम्यावस्थेतच’ हा ‘अधिकार’ प्राप्त होतो. शिवाय, ही शरीर, मन व आचार विचार व पिंड प्रकृतिची बुद्धी ही ‘कुंडलिनी शक्ती’ क्रमाक्रमाने घडवून आणते. कसे काय? तर, ही शक्ती जड नसून ‘स्वसंवेद्य वं ज्ञानी आहे. विश्वाच्या व प्राणीमात्रांच्या कल्याणासाठीच तिचा उगम, उदय विनियोग व उपचार आहे.

**Self Regulated Instruments**

ह्याचा अर्थ उघड आहे. वैश्विक महाऋषीचे दान व विज्ञान ह्या ‘कमकुवत मानवाला’ देण्याचे औदार्य ह्या विश्वनिर्मात्याकडे आहे. पण, हे दान क्रमाक्रमाने व शक्तीचे तात्कालिक स्वरुप व सामर्थ्य ह्याचा संतुलनात्मक, नैतिकतेने वापर करण्याच्या विवेकाच्या स्वरुपावरच मिळणार अशी व्यवस्था आहे. "Power Commensurate with state of Wisdom" असे दानाचे स्वरुप आहे. आणि म्हणूनच ह्या साधनेची द्वारे मंत्र शक्तीच्या कुलपाने (कुंडिकाने) भारलेली आहेत. हे मंत्रसामर्थ्य मिळवण्यासाठी तप-आत्मिक पातळीवर करावे लागते. ह्या साधनेचे तीन स्तर आहेत. जड शरीर, मन, सहस्त्रा चक्र वगैरे. ह्या तीन स्तरावर केवळ क्रमानेच व प्रत्येक पातळीवर ‘बुद्धी’ व ‘अधिकार’ मिळाल्यावरच हा उच्चाधिकार प्राप्त होणार आहे. ही साधना समाजाच्या जीवनात जन्म जन्मांतरीच्या प्रयोगाने करण्याचा निसर्गाचा हेतू आहे. त्याचेच अत्यंत सामान्य स्वरुप डार्विनने 'Materialist Evolution' ‘भौतिक उत्क्रांती’ त्या स्वरुपात पाहिले. महायोगी अरविंद ह्यानी Animal-Man-Divine ह्या साखळी पद्धतीने उन्नत होणाऱ्या consciousness ह्या स्वरुपात पाहिले.

**भारतीय संस्कृतीची धारणा**

पण, ह्या दर्शनात पाश्चात्य वैज्ञानिकाच्या अहंकाराचे व व्यवहारवादाचे प्रदर्शन नाही तर Divine help अंतर्भूत आहे. त्यामुळे, Evolution एका उंबरठ्यावर उभे आहे. हा भाव आहे. त्या क्षणी मानवाला ह्या उत्क्रांतीमध्ये सात्विक सहभागी-भागीदार होण्याचे आवाहन निसर्ग करीत आहे. पण, त्याला पात्र होण्याची आवश्यकता आहे. ही जबाबदारी पेलण्यासाठी - ही नैतिकता कमावण्यासाठी जी दिशा समाजाला हवी असावयाला पाहिजे, त्याची संपूर्ण जाणीव फक्त - आणि फक्तच भारतीय संस्कृतिलाच आहे आणि त्याची शुद्ध बीजे वेदात आहेत. लेखाचा हा भाव आहे.

ह्या खेरीज आणखी कोणते पुरावे उपलब्ध आहेत हे पुढच्या लेखात पाहूया.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट
अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

दि
शा
{Z`{_V dmMm.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

चित्रपालवी

# मुलांनी चित्रं काढायलाच हवीत

*'प्रौढ लोक लहान मुलांना शिकवू शकत नाहीत. उलट लहान मुलांकडून बरेच काही शिकता येईल'*
*- पाब्लो पिकासो*

रेषांशी, रंगांशी खेळणं हे तसं बहुतेक साऱ्याच मुलांना मनापासून आवडतं. आपल्या घरातली ही चिमणी फुलपाखरं रंगाच्या आकर्षणातून काही ना काही काढतच असतात. रेखाटन रंगवत असतात. ती त्यांची चित्रं असतात. पण त्याहीपेक्षा तो सारा त्यांच्या भावनांचा आविष्कार असतो. मुलाचं मन चित्रातून वाचता येतं. आपल्या अतृप्त इच्छा आकांक्षा ते चित्राद्वारे प्रकट करतात. रंग आणि चित्रकले इतकी मुलं कुठेही रममाण होत नाहीत.

अगदी प्राथमिक आणि गरजेचे जे काही उपजत आनंद घ्यायची मनुष्याला ओढ असते. त्यातला चित्रकला व रंगकाम हा फार मूलभूत आनंद आहे. म्हणून तो फार महत्त्वाचा. कारण मुलं हा आनंद आपला आपण घेऊ शकतात. ती त्याची उपजत प्रवृत्ती असते.

आपल्या मनातली भावनांना माध्यमाद्वारे सादर करणं, त्यातून अनुभूती घेणं म्हणजेच कला. म्हणून मुलांची चित्रकला ही नक्कीच 'कला' या प्रकारात येते. तो एक सतत वाहणारा, खळखळणारा स्त्रोत आहे, प्रवाह आहे. म्हणून एखादी वस्तू जशी आहे तशी न काढता ती जशी वाटते तशीच ती काढतात. मुलांना चित्रं कॉपी करण्यास देऊ नये, नाहीतर ती त्यांची चित्रं राहणार नाहीत व त्यांच्या व्यक्तिविकासाला अडथळा निर्माण होईल.

आजकाल चित्रकलेचा प्रसार करण्याच्या नावाखाली अनेक चित्रकला स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धांना प्रतिसादही उत्तम मिळतो. पण या स्पर्धांपायी त्या चिमुकल्यांचं काय होतं याकडे लक्षच जात नाही. स्पर्धेत पारितोषिक मिळावं यासाठी पालक आपल्या पाल्याकडून अक्षरश: चित्र घोटून घेतात, हे चुकीचं आहे. कलेसंबंधात अभिरुची वाढवताना बक्षिस मिळण्यापेक्षा चित्रं काढण्यावर भर द्यावा हे पालकांच्या लक्षातच येत नाही. बालचित्रकलेच्या तत्त्वज्ञानातील आशयाचं महत्त्वच त्यांच्यापर्यंत पोचलेलं नाही.

इंग्रजी, गणित, शास्त्र या विषयाचं जेवढं महत्त्व पालकांना जाणवतं तितकं चित्रकलेचं जाणवत नाही. मुलाचा कल अगर कुवत लक्षात न घेता त्याच्यावर इतर विषयांचा अभ्यास चक्क लादला जातो आणि मग त्यात अपयश आलं की मुलं निराशेपोटी हाय खातात. जीवनातील विविध वाटा चोखाळण्याची मुलांमध्ये हिंमत हवी. त्यासाठी त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास अधिक महत्त्वाचा मानायला हवा. त्यासाठी चित्रकला महत्त्वाची हे समजायला हवं.

चित्रकलेचा उपयोग जीवनातल्या विविध अंगात होतो आहे. त्यादृष्टीनं मुलांनी केवळ स्पर्धेत भाग न घेता कलेची अभिरुची वाढवायला हवी, टिकवायला हवी.पालकांनी हे लक्षात घ्यावं की आज चित्रं काढणारं मूल उद्या कलावंतच होईल असं नाही पण कला रसिक होऊन जीवनात आनंद नक्कीच उपभोगू शकेल. त्यानं पुढे कोणताही व्यवसाय पत्करला तरी त्याला कला अवगत असायलाच हवी. त्याची आवड असायला हवी. कारण तीच त्याच्या जीवनात आनंद निर्माण करेल.

महायुद्धाच्या काळातदेखील विन्स्टन चर्चिल चित्रं काढत असत. यावरुन माणसाच्या मनाचा समतोल राखायला कलेची अभिरुची उपयोगी पडते हे लक्षात येईल.

चित्रकला एक भाषा आहे. आत्मप्रकटीकरणाचं साधन आहे. दडपलेलं मन जसं बोलल्यामुळे मोकळं होतं तसं चित्रकलेमुळेही होतं. एक छोटा किस्सा आठवला. एक मुलगा छान चित्रं काढायचा. पण त्याच्या चित्रात एक खिडकी, त्याला गज, त्यामागे एक मुलगा व मुलगी असत. याबद्दल विचारल्यावर तो म्हणाला, 'आई कामावर जाताना रोज बाहेरुन कुलुप लावून जाते. मग आम्ही आईला खिडकीतून टाटा करतो.' यात त्यानं त्याची खंत दाखवली.

मुलांच्या कलानिर्मितीला मोकळीक मिळाली तर त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनं ते हितावह आहे. Free drawing has therepeutic value असं डॉ. रुथ ग्रिफिक्स म्हणतात. ते त्याच अर्थी या संदर्भात डब्ल्यू. व्हायोलाच्या Child Art या पुस्तकातील एक उदाहरण देता येईल. ते असं, एका मुलाला भीतीदायक स्वप्न पडत असे. त्यामुळे तो सतत घाबरल्यासारखा असे. अखेर त्याचं स्वप्न चित्राद्वारे जाणून घ्यायचा प्रयत्न केला आणि तेव्हापासून त्याला भीतीदायक स्वप्न पडेनासं झालं. दुसरा किस्सा असा की, एका मुलाला चित्र काढायला खूप आवडत असे. अगदी सरसावून बसायचा, चित्र काढायला पण जरा वेळानं नुसताच शून्यात दृष्टी लावून घाबरल्यासारखा बसत असे. त्याला विश्वासात घेऊन विचारल्यावर 'मला राक्षसाची भीती वाटते.' असं म्हणायचा. मी म्हटलं यावर आपण उपाय शोधू. त्या राक्षसाला कायमचं बंद करु, असं म्हणून त्याला त्या घाबरवणाऱ्या राक्षसाचं चित्र काढायला सांगितलं. त्या चित्रावर उभ्या आडव्या तिरक्या रेखा काढायला सांगून त्यावर कडी व कुलूप काढायला सांगितलं व म्हटलं. 'आता हा राक्षस कैदी आहे तो बाहेर पडून तुला त्रास देणार नाही.' तेव्हापासून त्याची भीती गेली आणि तो छान चित्रं काढू लागला. म्हणून वर म्हटल्याप्रमाणं चित्रकला आरोग्याच्या दृष्टीनं हितावह आहे. यासाठी मुलांनी चित्रं काढायलाच हवीत.

**मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : २५४१४५३९

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

*पुढील परिषद*

**आर्थिक गणित**

**दि. २६ ऑगस्ट २००६**

माहितीसाठी संपर्क - प्रा. आर. एस्. पोद्दार,
गणित विभागप्रमुख, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची**

*आगामी परिषद*

**नोव्हेंबर २००६**

**माहिती तंत्रज्ञान विभाग संयोजित**

**'लिनक्स, ठाणे २००६'**

# भीती

*मनात निर्माण होणाऱ्या असंख्य भल्याबुऱ्या भावना असतात. भीती ही भावना अशीच एक. या भीतीबद्दल हे स्फुट.-संपादक*

भीती ही माणसाला कधी कधी इतका पिच्छा पुरवते की ती आपल्याला त्राही भगवान करुन सोडते. अशी भिती म्हणले नेमके काय आहे याचा जरा आपण उहापोह करु या. भीतीने एकदा मगरमिठी मारली की आपले हात पाय गळून पडतात व दरदरुन घाम फुटतो. काही सुचत नाही. या करता भितीला तोंड कसे द्यायचे हे आपण शिकणे आवश्यक आहे. समजा रस्त्यावरुन चालताना येणाऱ्या जाणाऱ्या माणासांची आपल्याला भीती वाटत असेल तर जाता येता प्रत्येक माणसाकडे न पहाणे उत्तम आपण आपल्यातच गर्क रहायला शिकले पाहिजे व आपण कुठलीही चुक केली नसेल तर आपण घाबरायचे कशाला व आपले कोणीही काहीही वाकडे करु शकत नाहीत, ह्या मतावर आपण ठाम रहाणे आवश्यक आहे. आपल्याला आपल्या नोकरीत साहेबांची भीती वाटत असेल तर आपल्याकडून होणाऱ्या चुकांवर लक्ष केंद्रिंत करा. व आपणाकडून चूक होणार नाही याची काळजी घेता येईल. तसेच भीतीमुळे आजपर्यंत किती जणांनी आत्महत्या केल्या याची गणतीच नाही. प्रत्यक्ष भीतीचे कारण विशेष नसताना सुध्दा ह्या सर्व लोकांनी भीतीचा मोठा बागुलबुवा केलेला असतो. समजा भितीचा फुगा हवेने फुगवल्यासारखा मोठा मोठा होत जात असेल तरी चिंतेचे काही कारण नाही आपण कुठल्याही सकारात्मक विचारांच्या टाचणीने हा भितीचा झालेला मोठा फुगा फोडू शकतो हे ध्यानात घेतले पाहिजे. भीती आपल्याला अपयशाच्या खाईत पाडू शकते म्हणून जीवनात भीतीला किती महत्त्व द्यायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. कुठल्याही गोष्टीची भीती एका ठराविक सीमेपर्यंत ठीक आहे. परंतु कुठल्याही भीतीला त्याची सीमा ओलांडू देऊ नये. जेव्हा आपण एखादी चोरी करतो तेव्हा आलेली भीती ठीक आहे. ही भीती आपल्याला आपल्या झालेल्या चुकांवर प्रकाश टाकत असते. परंतु कारण नसताना स्वतःला कमी समजणे हे प्रथम आपण आपल्या मनातून काढायला शिकले पाहिजे. आपण आपल्याकडून होणाऱ्या चुका लक्ष देऊन कमी करायला शिकलो तर लवकरच आपण भीती मुक्त होवू. भीतीमुळे चिंता, चिंतेमुळे अविचार, अविचारामुळे अपयश अशी दुःखाच्या खाईत ढकलणारी भीतीची साखळी आहे. व या साखळीत आपण अडकणार नाही ना याची योग्य दक्षता आपण घेतली पाहिजे. व भीतीमुक्त जीवन ही यशाची पायरी (पहिली) आहे. भीतीचा नीट विचार केला असता या जगात घाबरण्यासारखे काहीच नसते. असतो तो फक्त भ्रम. म्हणून असल्या भ्रमाच्या भोपळ्यात न अडकता हा भ्रमाचा भोपळा वेळीच फोडायला शिकणे महत्त्वाचे. भिती वाटणे हे आत्माविश्वास नसण्याचे एक प्रमुख कारण आहे. म्हणून आपला आत्मविश्वास नित्यनियमित ठरवून वाढवायला शिका. आत्मसविश्वास वाढवणे म्हणजे भीतियुक्त मनोविकाराला कायमचीच रजा देणे हे होय.

घाबरे मन दुःखाला निमंत्रण

अशी एका म्हण आहे. म्हणून दुःखाला निमंत्रण द्यायचे का सुखाला आमंत्रित करायचे हे शेवटी आपल्यालाच ठरवायचे आहे.

**प्रसन्न गोविंद कुलकर्णी**
५, हेमकुंज, झवेर मार्ग, मुलुंड (प) मुंबई - ४०००८०
फोन नं. २५६१२३८८

# शिक्षणसंस्थांच्या 'हृदयाबद्दल'

*शालेय जीवनापासून मानवी आयुष्यात वाचन प्रक्रियेला असलेले स्थान केवळ अतुलनीय आहे. शिक्षण संस्था ग्रंथालयांना हृदय तर म्हणतात, पण बऱ्याचदा ...- संपादक*

माध्यमिक शिक्षणाचा काळ हा विद्यार्थी जीवनात फार महत्त्वाचा असतो. या काळातील विद्यार्थ्यांचे वय, संस्कारक्षम असते. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, मानसिक व भावनात्मक शक्तींचा विकास करणे हे माध्यमिक शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शाळांनी विद्यार्थ्यामध्ये नवनवीन ज्ञानाची क्षेत्रे पादाक्रांत करण्याची जिज्ञासा निर्माण केली पाहिजे. आणि त्यासाठी त्यांना ज्ञानसंपादनाची विविध साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत.

खऱ्या ज्ञानार्जनाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांमध्ये त्या त्या विषयाची आवड निर्माण व्हायला हवी. विषयासाठी आवश्यक ते वाचण्याची इच्छा निर्माण व्हायला हवी. आपल्या शाळांतून आज असे होताना दिसत नाही. ही अध्यापन पद्धती केवळ क्रमिक पुस्तकांवर आधारलेली असल्यामुळे ती विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देऊ शकत नाही. विद्यार्थ्यामध्ये स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची प्रवृत्ती निर्माण करू शकत नाही. परीक्षा, अभ्यासक्रम यांना अवास्तव महत्त्व दिले गेल्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाकडे वैयक्तिक लक्ष पुरविता येत नाही. परीक्षांचे अवास्तव स्तोम माजविण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानोपासनेवर बंधने येतात, उपक्रमशीलतेला वाव मिळत नाही.

आधुनिक शिक्षणशास्त्रामध्ये शिकविण्यापेक्षा शिकणे ही क्रियाच अधिक महत्त्वाची असल्याचे सर्व शिक्षणतज्ज्ञ मान्य करतात. पोपटपंची करून प्राप्त केलेल्या ज्ञानापेक्षा स्वयंशिक्षणाने प्राप्त होणारे ज्ञान निश्चितच अधिक श्रेयस्कर असते. सध्या ज्या परीक्षा घेतल्या जातात त्या ज्ञानाच्या कसोट्या नसतात तर त्या फक्त स्मरणशक्तीच्या, पाठांतराच्या कसोट्या असतात. वार्षिक परीक्षांचे हे स्वरूप बदलले तरच मार्गदर्शिका, पाठांतर यांचे महत्त्व कमी होऊन विद्यार्थी विविध विषयांच्या आधारभूत ग्रंथाकडे वळतील. ज्या शाळांतून ग्रंथालयाचा वापर अधिकाधिक केला जाईल त्या शाळा आपली शैक्षणिक उद्दिष्टे उत्तम प्रकारे पार पाडू शकतील.

आधुनिक शिक्षण पद्धतीनुसार शिक्षकांनी परंपरागत पद्धतीने न शिकविता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विषयाची गोडी लावून त्यांना स्वयंशिक्षणासाठी प्रेरित करावे. विषयांच्या मूलभूत व आधारभूत ग्रंथांचे वाचन विद्यार्थ्याकडून व्हावे असे प्रयत्न शिक्षकांनी करावयास हवेत. विद्यार्थी काय शिकतात या पेक्षा ते कसे शिकतात याला आता अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुलांची बौध्दिक वाढ करणे, त्यांच्यामध्ये मुळातच असणाऱ्या सहजप्रवृत्ती जोपासणे व त्या वाढीस लावणे हे जे शिक्षणाचे हेतू मानले जातात ते साध्य करण्यासाठी मुलांमध्ये असलेली जिज्ञासावृत्ती जोपासून ती वाढीला लावण्यासाठी त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करून त्यांना वाचायला प्रवृत्त केले पाहिजे.

ग्रंथालयाला शिक्षणसंस्थेचे हृदय म्हटले जाते ते काही उगाच नाही. कारण संस्थेच्या सर्व शैक्षणिक

हालचाली या हृदयाच्या स्पंदनावरच अवलंबून असतात. शाळांनी हे हृदय सुस्थितीत ठेवले तर विद्यार्थ्यांना चांगली ग्रंथालय सेवा मिळू शकेल आणि शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी त्यांना चांगले ग्रंथ उपलब्ध करून देऊन ते वाचण्याची सवय शालेय जीवनातच लावण्याची जबाबदारी शालेय ग्रंथालयांवरच असते.

आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड आणि सवय निर्माण करून ती वाढीला लावण्याच्या कामाला शाळांनी प्राधान्य द्यायला हवे. पुरोगामी शैक्षणिक धोरणे प्रत्यक्षात आणण्यासाठी शालेय ग्रंथालय हे एक आवश्यक आणि प्रभावी साधन आहे असे मानावयास हरकत नाही.

ग्रंथ हे गुरू आहेत, ग्रंथांचे वाचन ही साधना आहे या साधनेने आपले व्यक्तिमत्त्व व भविष्य घडत जाणार आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना योग्य वेळी झाली तर शिक्षणाची उद्दिष्टे साध्य होण्यास, गुणवत्ता वाढण्यास फारसा अवधी लागणार नाही.

विद्यार्थ्यांच्या अपुऱ्या वाचनामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. एखादा दहावीचा मुलगा चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होतो. पण त्याला जर एखाद्या विषयावर उत्स्फूर्त बोलायला सांगितले तर त्याची ततपप होते म्हणजेच काय, तर त्याचे वाचन अपुरे असते. तो केवळ पाठांतर करून व स्मरणशक्तीच्या जोरावर जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असतो. अपुऱ्या वाचनाची समस्या जर सोडवायची असेल तर त्यात शिक्षक, पालक, विद्यार्थी, समाज या सगळ्यांचे योगदान अपेक्षित आहे.

याचे एक कारण म्हणजे शिकवणी वर्ग. विद्यार्थी पाच तास शाळेत जातात पुढचे चार तास शिकवणीला जातात. त्यामुळे शाळा, क्लास, शाळेचा घरचा अभ्यास, शिकवणीचा, घरचा अभ्यास या मध्येच त्याचा इतका वेळ जातो की आपण इतर काही वाचू किंवा वाचावे असे त्यांना वाटतच नाही.

पालकांनीही विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या वाचनाचा छंद जोपासण्यासाठी पुस्तके घेऊन द्यावीत. पालक विद्यार्थ्यांना शाळेची पुस्तके गाइडस् वगैरे घेऊन देतात पण इतर पुस्तक मागितले तर 'आधी शाळेची पुस्तके वाचा' असे म्हणून इतर पुस्तकांकडे दुर्लक्ष करतात.

सुट्टीचा उपयोग वाचनासाठी करावा. सुट्टीत मुलांना वेगवेगळी पुस्तके आणून द्यावीत. ती वाचल्यामुळे त्यांचा वेळही चांगला जातो व वाचनाचा आनंदही मिळतो.

**दीपाली नंदलाल बोरकर**
१०४/ विठाई कृपा, न्यू आयरे रोड,
राजाजी पथ क्रॉस लेन, डोंबिवली (पू).

## महाविद्यालय परिसरातील संस्था प्रमुख

**प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर -**
बा. ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग -**
ना. गो. बेडेकर वाणिज्य व के. ग. जोशी कला महाविद्यालय

**प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार -**
ठाणे नगरपालिकाचे विधी महाविद्यालय

**प्राचार्य डी.के.नायक -**
विद्या प्रसारक मडंळाचे तंत्रनिकेतन

**संचालक डॉ.गुरुप्रसाद मूर्ती -**
डॉ. वा. ना. बेडेकर संशोधन व व्यवसथापन अभ्यास संस्था

पुस्तक परिचय

# रणांगण : रसग्रहण

*रणांगण ही मराठीतील एक 'मैलाचा दगड' ठरलेली कादंबरी. कादंबरी जुनीच पण तिचा रसास्वाद हा प्रतीक्षणी वेगळा आनंद देणारा, समृद्ध करणारा असतो. ही कादंबरी पुन्हा वाचावीशी वाटायला लागते तो असा लेख वाचून. - संपादक*

''रणांगण ही विश्राम बेडेकर यांची अतिशय गाजलेली, मराठीतील मानदडं ठरलेली एक देखणी कलाकृती, दीर्घकथा का कांदबरी ...'' भावात्म पातळीवर राहून यशस्वीरित्या लिहिलेल्या अनेक दीर्घकथा आहेत. रणांगण ही अनेक दृष्ट्या एक अपूर्व कलाकृती आहे. बेडेकरांची ती एकमेव कांदबरी आहे. रणांगणाचा रसास्वाद नेमक्या कोणत्या दृष्टीकोनातून करायचा हे प्रत्येक वाचकावर अवलंबून आहे.

ही एवढी लहान कादंबरी; पण जीवनातील निरागसता, स्वार्थ, लोभ, वासना, आसक्ती, द्वेष, उपहास, विटंबना, प्रेम, आत्मविस्मृती, आत्मसमर्पण आणि पुन: या सगळ्या खेळाची पराधीनता, त्यातून व्यक्तींना जाणवणारी अगतिकता यांचा असा काही प्रत्यय देते की, मन स्तिमित व्हावे. रणांगणचा विषयही तसाच अपूर्व, परका आहे. रणांगणचे प्रत्यक्ष कथानक घडते ते बोटीवरील अकरा दिवसांच्या प्रवासात. पण त्याचे धागेदोरे गुंतलेले असतात कादंबरीतील व्यक्तींच्या सगळ्या भूतकालात, येणाऱ्या भविष्यात- या कांदबरीचा कालखंड आहे पहिल्या महायुध्दानंतरचा व दुसऱ्या महायुध्दाच्या आरंभीचा. 'रणांगण' मध्ये चित्रित झालेल्या अनुभवविश्वाकडे पाहिले की त्याची विशालता जाणवते. वाटते की या दीर्घकथेंचा आवाका मोठा आहे, मग हिला कादंबरी का म्हणू नये ? याला उत्तर इतकेच की, एखाद्या लघुकथेचादेखील आवाका एवढा मोठा असू शकतो; पण म्हणून आपण तिला कादंबरी म्हणू शकणार नाही. तीच गोष्ट या दीर्घकथेच्याबाबतीतही खरी आहे. 'रणांगण' एकात्म प्रवृत्तीची आहे. तिची रचना बांधेसूद आहे. तिच्यात स्वतंत्रपणे विस्तार पावण्याच्या वेगवेगळ्या अनुभवसंघटना नाहीत आणि म्हणून ती कादंबरी नसून दीर्घकथा आहे. अर्थात असे म्हटल्यामुळे तिचा दर्जा अगर अर्थपूर्णता कोणत्याही कांदबरीपेक्षा कमी ठरते असे मानण्याचे कारण नाही. 'रणांगण' एका विशिष्ट प्रकृतीची ललितकृती आहे. एवढाच या विधानाचा अर्थ.

एक महाराष्ट्रीयण तरुण आणि हिटलरच्या छळामुळे निर्वासित झालेली एक जर्मन ज्यू तरुणी यांची बोटीवरच्या दहा दिवसांच्या प्रवासात घडलेली प्रेमकथा या दीर्घकथेत चित्रित केलेली आहे. प्रेमकथांना मराठी साहित्यात तोटा नव्हता आणि नाही. पण एका निर्वासित जर्मन ज्यू तरुणीचे, तिच्या उध्वस्त जीवनाचे आणि तिच्या व्याकूळ मन:स्थितीचे इतके समरसतेने केलेले चित्रण मराठी साहित्यात अजूनही अपूर्वच आहे. आणि वर्णद्वेष, धर्मद्वेष व राष्ट्रद्वेष यांची जी पार्श्वभूमी त्या कथेला दिलेली आहे तीदेखील अगदी वेगळी, अपरिचित आहे. एका वेगळ्याच कलात्मक पातळीवर, एखाद्या आकाशात उंचावर मंडळ घ्यावे तशी ही दीर्घकथा घडते - सांगितली जाते.

प्रेमात झालेल्या फसगतीमुळे ज्याचे मन कटु आणि कठोर झालेले असते असा चक्रधर उर्फ बॉब नावाचा, देखणा महाराष्ट्रीय तरुण आणि हिटलरच्या वर्णद्वेषामुळे जिचे जीवन उध्वस्त झाले आहे. अशी हॅर्टा नावाची, जगण्यासाठी आसुसलेली जर्मन-ज्यू तरुणी यांच्या विफल

प्रीतीची कथा 'रणागंण' मध्ये आहे. जिनेव्हा ते मुबंई प्रवास करणाऱ्या एका इटालियन बोटीवर एका अलग, सुरक्षित तंरगत्या जगात ही कथा घडते. आणि जेव्हा तो प्रवास संपतो आणि जमीनीवर पाय ठेवायची वेळ येते तेव्हा काचेची सुंदर फुलदाणी खळकन फुटावी अशी ती प्रीती उध्वस्त होते. बॉब मुंबईला उतरुन निघून जातो. आणि एखाद्या दृष्ट राक्षासाने काचेच्या बाटलीत बंद करुन ठेवलेल्या राजकन्येसारखी हॅर्टा त्या बोटीत अडकून पडते. प्रवाहपतितपणे हाँगकँगपर्यंत जाते आणि तेथे समुद्रात उडी मारुन जीव देते.

'रणांगण' ही कथा प्रीतीची असली तरी पहिल्या प्रेमाची नाही. चक्रधरचा प्रेमभंग झालेला असतो. उमा नावाच्या तरुणीशी त्याच्या आणाभाका झालेल्या असतात. पण नंतर ती कलकत्त्याला निघून जाते आणि तेथे एकाएकी दुसऱ्याच एका तरुणाशी विवाहबद्ध होते. त्यामुळे चक्रधरचा अहंकार दुखावलेला असतो, मन विकल झालेले असते. प्रेमावरचा, स्त्रीवरचा त्याचा विश्वास उडालेला असतो. आणि जणू आपल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी, स्त्रीजातीवर सूड घेण्यासाठी युरोपमध्ये तो प्रीतीच्या बाजारात यथेच्छ मुशाफरी करतो. पण त्यामुळे तो अधिकच विटतो. आणि असा बेचव तोंडाने जेव्हा तो बोटीवर चढतो, तेव्हा आपले सर्वस्व पेल्यात ओतून त्या पेल्यानिशी हॅर्टा त्याला सामोरी येते.

या अकरा दिवसांतच उमललेल्या आणि अकाली मिटलेल्या, आपल्या व हॅर्टाच्या प्रीतीची कथा सांगतासांगताच, चक्रधर स्वत:च्या व हॅर्टाच्या पूर्वायुष्यांशी कथाही सांगतो. इतर कथाभागाला आधार आहे तो या दोघांतील नात्याचा घडत जाणाऱ्या टप्प्यांचा. शिंदे या उमद्या तरुणाचे बोटीवरच्याच लहानग्या लुई नावाच्या जर्मन मुलावर जडलेले निर्व्याज, निरपेक्ष प्रेम, मदनाची क्षणिक वासना व तिला बळी पडलेली मार्था, केवळ जीवनाच्या प्रवासानेच शिणलेली तिची आई, चक्रधरवर हॅर्टाचे मन जडले आहे हे जाणत असतानाही तिच्यावर प्रेम करणारा तिच्याशी लग्न करु इच्छिणारा मन्नान, जीवनाची उपटलेली मुळे अगतिकपणे पण जगण्याच्या तीव्र इच्छेने दुसऱ्या भूमीत रोवण्यासाठी धडपडणारा कायटेल; अकरा दिवसांची मौज मुक्तपणे भोगू पहाणारी, ज्यू निर्वासितांबद्दल मनात करुणा बाळगणारी, पण आपल्याला धर्म-जाती-देश विषयक पूर्वग्रहांना न सोडणारी मंडल, मायकेल, सहाय, चतर्जी वगैरे तरुण मंडळी, उद्दाम पण शक्तीचा प्रत्यय आल्याबरोबर घाबरलेला बोटीवरील परिचारक :- ''बहात्तर हिवाळ्याची वाताहातच'' अशी हॅर्टाची आई, द्वेषाच्या स्फोटक दारुगोळ्याने भरलेले, ठिणगीचीच वाट पहाणारे बाह्य जगातले वातावरण आणि बोटीवरील तरंगते विश्व; या सर्वातील अनेकविध ताणांनी हे 'रणांगण' घडलेले आहे.

या दीर्घकथेतला मध्यवर्ती अनुभव अनेकांगी, प्रगल्भ व जीवन ढवळून काढणारा असल्यामुळे ती विशेष अर्थपूर्ण झाली आहे. एक उच्च कलात्मक दर्जा तिला प्राप्त झाला आहे.

प्रीतीच्या या मध्यवर्ती अनुभवाच्या भोवती प्रेमाचे इतर, सकसनिकस अनुभव आहेत. त्याच्या एका बाजूला चक्रधराच्या पहिल्या प्रेमभंगाची जखम आहे, तर दुसऱ्या बाजूला हॅर्टा व कार्ल यांच्या निर्घृण ताटातुटीची व्यथा आहे. शिवाय, चक्रधर युरोपमध्ये बाजारी प्रेमाचे अनेक अनुभव घेतो. आणि बोटीवरचे हिंदी तरुणदेखील वाटमारी करुन शरीरसुख मिळवीत असतात. एखाद्या भव्य, सुंदर पुतळ्यावर कबुतराने शिटावे तसा हा प्रकार चालूच असतो. पण प्रेमाच्या अनुभवाच्या या हिणकस खुर्द्यातदेखील चांदीचा अंश असतो. हॅर्टाभोवती लोलुपतेने घिरट्या घालणारा मन्नानदेखील तिच्यावर प्रेम करु लागतो. तिच्याशी लग्न करायला तयार होतो. हॅर्टाला आणि तिच्या आईला परस्परांविषयी वाटणारे प्रेमदेखील या कथेत जागोजागी व्यक्त होते, हे प्रेमही निर्मळ असते, पण ते सवयीतून, पंरपरेतून निर्माण झालेले असते, दुबळे असते, रंग उडालेल्या चित्रासारखे असते. अगदी असह्य झाले

म्हणजे त्या त्याचा आसरा घेतात पण ते त्यांना कोणताच आसरा देऊ शकत नाही. हॅर्टाला अनिवार दु:ख होते तेव्हा ती आईच्या मांडीत डोके लपविते पण ''क्षीणशक्ती झालेल्या त्या मांड्या त्यांच्यात तिचे मस्तक दाबून धरण्याइतकाच आवेग कुठला उरणार !''

रणांगणमधील स्फोटक द्वेष केवळ पार्श्वभूमीचेच काम करीत नाही. त्याचा वणवा जर्मनीत पेटलेला असतो. त्यात होरपळलेली हॅर्टाच या दीर्घकथेची नायिका असते. त्या वणव्यामुळे हॅर्टाच्या हृदयाला जी कोरड पडते. त्याच्यामुळेच ती प्रीतीचा ओलावा जिवाच्या आकांताने शोधते. त्या वणव्यात ती निराश्रित होते म्हणून तर तिचे प्रेम इतके विशद्ध आणि वादळी होते.

या द्वेषाच्या वणव्यात हॅर्टाचे जीवन कसे उध्वस्त होते, माणसांतून ती कशी उठते, आपल्या अस्तित्वाविषयीच तिच्या मनात कसा भ्रम निर्माण होतो याचे विदारक चित्र बेडेकरांनी या दीर्घकथेत मोजक्या शब्दांत पण अत्यंत प्रत्ययकारीपणे आपल्यासमोर उभे केले आहे. त्याचबरोबर माणसाजवळ असलेल्या संस्कारांच्या शिदोरीवरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. हॅर्टाच्या तोंडचे वाक्यच आहे, पण लेखकाने ते अत्यंत भावनाशीलपणे एका प्रसंगात चित्रित केले आहे. - (पृष्ठ५१)

या व्यक्तींची व्यक्तिमत्त्वे हे या कादंबरीचे प्रमुख घटक आहेत. त्यांच्या गुणवत्ता, त्यांच्यातली संबंध यांतूनच या कादंबरीतल्या भावाशयाची मूलाकृती, तिचे वजन, घनता, दिशा ही सारी घडवली गेली आहेत. हॅर्टा प्रथम चक्रधराकडे आकर्षित होते ती त्याच्या ऐटीने, बेदरकारीने, त्याच्या कानात घुमणाऱ्या हास्याने, त्याच्या 'स्वत:चा प्रत्यय आलेल्या' व्यक्तिमत्वाने, त्याच्या पौरुषाच्या दर्शनाने ! अशा पुरुषाच्या समर्थ मुठीत स्वत:ला झोकून देऊन तिला तिच्या भविष्याबद्दल निश्चिंत व्हायचे होते. तीच तिची एकमेव आस होती. तो प्रीतीच्या खेळात पुढाकार घेणार नाही हे ध्यानी येताच, तीच पुढे होते. आपल्या स्त्रीत्वाच्या आकांताने ती हे करीत असते खरी, पण दरवेळी आपण आपल्या पहिल्या प्रीतीची मूर्ती भ्रष्ट करीत आहोत या जाणीवेने ती बेचैन, भयभयीत होत असते. असह्य अपमानाच्या उपेक्षेत आपले अस्तित्व हरपले अशा जाणिवेने भ्रमिष्टासारखी होते.

स्वत:च्या व्यक्तित्त्वाच्या गाभ्यात पंगू झालेल्या चक्रधराने या अंतिम प्रसंगात आपल्यालाही पंगू केले, आणि कदाचित याच अपराधी भावनेतून त्याने आपल्याशी लग्न करायची तयारी दाखवली असेल. असे तिला वाटू लागले का ? नाहीतर , ''तुझे जर माझ्यावर प्रेम नव्हते, तर माझ्याशी लग्न करायला तू का तयार झालास, बॉब?'' असे ती म्हणताना तिला हेही कळले होते का, की केवळ परिस्थितीतील अशक्यतेमुळे नव्हे, तर चक्रधराच्या व्यक्तित्त्वामुळेच ते घडणे अशक्य आहे, आपल्या प्रीतीला भविष्य नाही?

पण आधार हवाच जगण्याला, काही आधार हा हवाच ''तू भेटलास ना ? या दहा दिवसांच्या आठवणीवर मी खूप दिवस जगेन'' असे ती म्हणू लागली ''येशूच्या नुसत्या नजरेने पेल्यांतल्या पाण्याचे सुंदर मद्य झाले'' असे सांगू लगाली. त्याचे रुप, त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याचा कठोरपणा, त्याच्या हालचाली, थोड्याश्या जेश्चर्स, क्वचित मिळालेले प्रीतीचे शब्द, या साऱ्यांना निराळ्या उदात्ततेच्या पातळीवर नेऊ लागली. पण तसे करत असतानाही ही मुलगी जीवनाने आपणाला नुसतेच, सर्वस्वासकट उध्वस्त केले हे जाणून आत आत मोडून गेली.

हॅर्टाच्या ''तू मला हवा आहेस, बॉब पण तू मिळत नाहीस म्हणून मन शतश: विदीर्ण होते !'' या आत्महत्येपूर्वीच्या आकांतात तिच्याच नव्हे तर मानवी जीवनाच्याच अटळ शोकांतिकेचा केवढा ताण सामावलेला आहे. म्हणून एकदा वाटते, आपल्याला ही कादंबरी कळली. पण पुन: वाटते, छे, ती कळली नाही. एक विलक्षण वेगाने धावणारे मानवी मन आणि त्याचे न समजणारे कितीतरी पैलू या कादंबरीत सामावलेले आहे.

कळली न कळली, तरी तिचे भावविश्व मात्र आपल्याला विलक्षण भुरळ घालते.

''It is a great, intense, and intensely human document''. ही एक चिरंतन सौंदर्याने नटलेली कलाकृती आहे.

तिच्या भावशयाची मूलाकृती पुन: नजरेसमोर येते. परिस्थितीने झालेली पण आंतरिक गाभा - शक्तिकेंद्र - अभंग असलेली हॅर्टा आणि परिस्थितीने स्थिर गाभा उध्वस्त झालेला चक्रधर या कांदबरीच्या सुरवातीला एकत्र येतात. आपल्या उध्वस्त व्यक्तिमत्त्वाला दुसऱ्या व्यक्तीचा आधार मिळतो का ते पाहत असतात. तशा आधाराने जीवन पुन: रुजविण्याची आशा धरतात. आणि शेवटी काय होते? परिस्थितीने उध्वस्त झालेली हॅर्टा प्रीतीभावनेतही अपयशी होते, प्रियकराला सर्वस्वी आपला करु शकत नाही, परिणामी अंतरीच्या गाभ्याशीही उध्वस्त होते. बाह्य परिस्थितीची सुरुवात खरे तर स्वत:च्या शरीरापासूनच होते. अंतरात उध्वस्त असलेल्या चक्रधराला कळते की, आपली बाह्य परिस्थितील स्थिरता. आधार हा एक आभास होता. या दोन व्यक्तींची निरनिराळ्या रुपांतील उध्वस्तता ही खरोखर मुळाचीच उध्वस्तता होती, ती इतकी परिपूर्ण होती की त्यातून एकमेकांना आधार मिळूच शकला नाही.

एक प्रचंड विलक्षण उलथापालथ या कादंबरीत घडते:- अनेक जीवनपट भूत-वर्तमान भविष्यासकट उलगडले जातात, चक्रधर व हॅर्टा यांच्याच नव्हे तर इतरही अनेकांच्या संपूर्ण जीवनाची घालमेल होते.

या कांदबरीची भाषाशैली निवेदनात्मक आहे. निवेदनात वापरलेल्या मनोगते व चित्रपटकथा या दुहेरी तंत्राचा, प्रतिमांचा या कांदबरीतील घटनांवर प्रभाव आहे. या कांदबरीतील वर्णने, हालचाली, संवाद एकाच वेळी अनेक पातळ्यांवर वापरलेले आढळतात.

रणांगणची मूलाकृती कोणती असेल याचा जर विचार केला तर असे जाणवते की उध्वस्तता व संयोग, उपटले जाणे आणि पुन: रुजणे, मोडणे व घडणे यांचाच जीवनाव्यापी खेळ इथे लेखक रेखाटतो, पण असे जरी असले तरी तर या कादंबरीचा तोलबिंदू आहे तो तिच्या निवेदनात., हॅर्टाच्या पत्रात... संवाद आणि विरोध यांची लयबध्द गुंफण या अनुभवविश्वात आहे. या रचनेत भर आहे तो विरोधावर. या विरोधाच्या दाबामुळे या अनुभवविश्वातला असह्य ताण निर्माण होतो. त्यामुळेच जगण्याची, धडपड, ईर्ष्या इतक्या तीव्रपणे या दीर्घकथेत आपल्याला जाणवते. त्यामुळेच तिच्यात कडवट उपरोध निर्माण होतो. आणि त्यामुळेच रणांगण ही शोकात्मिका होते.

रणांगणाची कथा एका जहाजावर घडते अफाट समुद्रात तंरगणाऱ्या, अमर्याद क्षितिजाने वेढलेल्या आणि त्याचा भेद करायला धावणाऱ्या, लाटांवर नाचणाऱ्या दिव्यांनी, झगमगणाऱ्या पियानोच्या स्वरांनी भारलेल्या अशा एका चिमुकल्या विश्वात चक्रधर आणि हॅर्टा यांचे प्रेम उमलते..., अकराव्या दिवशी फुलायचे स्वप्न बघते. स्वातंत्र्य आणि सौंदर्य यांच्या परिसरात दोन जीवांचे काव्यपूर्ण मीलन होते.

संवाद आणि विरोध साऱ्याच कलाकृतीत असतात. तेव्हा निव्वळ त्यांच्या अस्तित्त्वामुळे काही कोणतीही कलाकृतीत श्रेष्ठ ठरत नाही. ही संवाद व विरोधांची गुंफण किती अनपेक्षित व अर्थपूर्ण आहे. यावर कोणत्याही कलाकृतीची गुणवत्ता अवलंबून असते.

एकमेकांकडे तोंड करुन टोकांवर उभे असलेले दोन त्रिकोण एका बिंदूशी एकमेकांना भिडलेले असतात. काही काळ एकमेकांना आधार देतात. पण... ज्या क्षणी त्यांच्या लक्षात येते... की हे तर आपले प्रतिबिबं !- तेव्हा जो कोसळतो, तो त्रिकोण एकच असतो.

**सौ. मानसी देशमुख**
गंगाधाम, पुणे

# संजीवनी बालबोध गीता

(शके १८३२ चैत्र शु.९)

*गीतेसंबंधातील पुस्तकांच्या परिचय मालिकेतील पुढचा लेख. - संपादक*

१९४० सालचे, अतिशय दुर्मिळ असे हे छोटेखनी पुस्तक मला एकांच्या घरी दिसले. मी ते त्यांना मागून घरी आणले. म्हटले या दुर्मिळ पुस्तकाचा परिचय सर्वांना करुन देऊ. पुस्तकाला पुठ्ठयाचे बाईंडिंग केलेले कव्हर आहे. मुखपृष्ठावर तीर्थक्षेत्राच्या पार्श्वभूमीवर 'शामच्या आईच्या' आईसारखे एका (बाईचे नाही) आईचेच चित्र आहे. तिच्या हातात 'संजीवनी बालबोध गीता' हेच पुस्तक आहे. मलपृष्ठावर काही मराठी श्लोक आहेत. मलपृष्ठ थोड खराब व जुने झालेले असल्यामुळे सर्व श्लोक नीट कळत नाहीत. शेवटचा श्लोक कळतोय तो असा आहे. दुरात्मे अही मारिले चैनतेये।अहिंसाच ती मानिली देवराये।। पुस्तक ज्याच्याकडून मी आणले, त्यांनीच ते बाईंड केले असावे, त्याला नीट कव्हर सुध्दा घातलेले आहे. जुने पुस्तक जे अमूल्य आहे, दुर्मिळ आहे ते टिकून रहावे म्हणून .

मुखपृष्ठाचे पान उलटल्या बरोबर एक छोटे पत्रक त्यावर चिकटवलेले दिसते. त्यावरचा मजकूर असा एज्युकेशनल इन्स्पेक्टर सी.डी.आणि प्रेसिडेंट मराठी स्कूल बुक कमेटी पुणे, यांचे ता. १८/२/४१ चे नंबर एस. ६६ बी. एस १९४० या हुकुमा अन्वये हे पुस्तक प्राथामिक व दुय्यम शाळाच्या व शिक्षण संस्थाच्या विद्यार्थी ग्रंथालयास मंजूर झाले आहे.

डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन सेंट्रल प्राव्हिंनसेस नागपूर यांनी ता. ४/१/४१ चे १६९ नंबरचे आज्ञापत्राने हे पुस्तक सेंट्रल प्रॉव्हीसेस आणि बेरार मधील मिड्ल व हायस्कूल लायब्ररीस आणि बक्षिसाकरितां मंजूर केले आहे.

ट्रेड मेंबर देवास ज्युनिअर यांच्या ता. २२/४/४१ चे १९५६ ऑर्डर प्रमाणे हे पुस्तक हायस्कूलच्या आठव्या इयत्तेस रॅपिड रीडिंग करता लावले आहे.

डायरेक्टर, स्कूल एज्युकेशन, होळकर स्टेट इंदुर यांनी बालबोध गीता - (पुढील आवृत्तीचे नाव त्रिपदा गीता) संजीवनी बालबोध गीतेतील पाहिले तीन अध्याय या पुस्तकास ता. ९/१०/४० चे नोटिफिकेशनच्या द्वारें मिड्ल स्कूलच्या लायब्ररीकरता आणि बक्षिसाकरितां मंजुरी दिली आहे.

वामन गोपाळ थत्ते

यानंतर आत मोरपीस खोवलेले श्रीकृष्णाचे ओंकारात चित्र आहे. चित्रायोग अर्पण पत्रिका - रामदास स्वामींच्या फोटो खाली-

पराधीनता जो मनी शल्य वाहे
उदासीनता जो आत्मा सौख्यांत राहे
प्रसन्ने मनें आर्थिक त्या समर्था
महाराष्ट्र- संजिवनी ही सुगीता - या ओळी आहेत.

गीतेसारख्या स्वयंप्रकाशित हिऱ्याचे मराठीकरणास पुढे दिलेले माननीयांचे (प्रो.शं.वा. दांडेकर, साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर, धर्मवीर ल. ब. भोपटकर, केसरी ऑफीस, पुणे, लोकनायक माधव श्रीहरी अणे, श्रीमंत राणीसाहेब संस्थान सांगली, श्रीमंत नारायणाराव बाबासाहेब घोरपडे, अधिपति इचलकरंजी वगैरे) अभिप्राय हे एक प्रस्तावनेदाखल आहेत असे म्हटले तरी चालेल. असे आपले दोन शब्द व्यक्त करतांना लेखाकाने म्हटले आहे.

ज्ञानेश्वरी सारखी लोकोत्तर मराठी टीका, फार जुनी व अलंकारिक भाषा म्हणून बहुजन समाजास बरीच दुर्बोध वाटते. वामन पंडित, मोरोपंत यांच्याही श्लोकात्मक आर्यात्मक सुंदर टीका सहजासहजी साकलन होणाऱ्या नाहीत म्हणून हे श्लोकबद्ध भाषांतर शक्यतोवर सोपे शब्द योजून केले आहे.

श्री समर्थ रामदास स्वामींनी भुजंग - प्रयात वृत्तांतील आपल्या वाङ्मयाने राष्ट्रजागृती व धर्मजागृती परिणामकारक रीतीने केली आहे असे आम्हास वाटते. गाण्याचे अंग नसणाऱ्यालाही सहज म्हणता येण्यासारखे व पाठांतरास सोपे व मनाच्या श्लोकांमुळे नित्यांच्या परिचयाचे व चैतन्यात्पादक शक्ती असलेले हे वृत्त आहे असे वाटल्यामुळे आम्ही बालबोध गीतेस आमूलाग्र हे एक वृत्त वापरले आहे. वृत्ताच्या समर्थकतेसाठी ऱ्हस्व अक्षरे दीर्घ व दीर्घ अक्षरे ऱ्हस्व करावी लागली आहेत.

चौथ्या अध्यायातील १७ व्या श्लोकानंतर कर्म, विकर्म व अकर्म यांची टीका स्वतंत्र श्लोकाने दिली आहे. इतरही काही ठिकाणी अध्याय २.६९, ८.२४,२५ व १५.६ या रुपकालकाराचे स्पष्टार्थ श्लोकरुपाने दिले आहेत.

द्यावे ते वळण घेऊन चढणारी बालबुद्धी ही एक कल्पलता आहे. तिला वाढीस लावणे हे प्रत्येक भारतवासियाचे आद्य कर्तव्य आहे. स्वातंत्र्याचा अमृतकलश शक्यतो शीघ्र हाती यावा या करिता कर्तव्याचा बोध करुन देणारी ही भुजंगप्रयाती-शीघ्रगामी बालबोध गीता तरुण भारतांच्या हाती देत आहोत.

गीता तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाबरोबर राष्ट्रबलसंपन्न होणे तितेकच महत्त्वांचे आहे. म्हणून बालबोध गीतेला मंगलाचरणाने बलोपासनेची जोड दिली आहे. व्यायामाच्या दृष्टीने शास्त्रोक्त नमस्कार कसा घालावा हे समजण्यासाठी नमस्कारांची सचित्र माहितीही मुले, पालक व शिक्षकांना उपयुक्त अशी दिली आहे.

गीता महात्म्य व गीताध्यान यांचेही भाषांतरीत श्लोक यात दिले आहेत. नंतर गीतेला सुरुवात झाली आहे. वानगीदाखल अध्याय १ ला श्लोक १ ला पहा - ''धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे...

पुसे कौरवाधीश वार्ताहराला
दिली दिव्यदृष्टी मुनीने जयाला
कुरुक्षेत्र जी भारती धर्मभूमी
मिळाले तिथें सर्व ते युद्धकामी
रणी आमुचे पांडुचे पुत्र ठेले
तिहीं त्या स्थळी संजया काय केले?- १

या श्लोकातील पहिल्या दोन ओळी धृतराष्ट्र उवाच (म्हणजे धृतराष्ट्र संजयाला विचारतो आहे) या अर्थी आल्या आहेत नंतर प्रत्यक्ष श्लोकाचे भाषांतर ''धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे... संजय उवाच - या अर्थी पहिल्या दोन ओळी आल्या आहेत म्हणून सहा ओळींचा श्लोक झालाय हे वाचकांनी लक्षात घ्यावे. फक्त जिथे अर्जुन उवाच, भगवान उवाच असे आले आहे तो श्लोक सहा ओळींचा व बाकी सर्व चार चार ओळींचे आहेत 'बालबोध गीतेत' असे गीतेसारखे 'धृतराष्ट्र उवाच' 'संजय उवाच असे लिहिलेले नाही. त्याच्याबद्दल दोन ओळी जास्तीच्या घातलेल्या आहेत. आता श्लोक दुसरा पहा-

असा ऐकुनी प्रश्न राजेश्वराचा
वदे सूत तो युद्ध वृत्तांत साचा
नृपा! तेथ दुर्योधनें पाहुनियां
चमू पांडवी सज्ज व्यूहे लढाया
त्वरे जाऊनी नीट द्रोणा समीप
वदे त्यास तो हस्तिनापूर - २

आता दुसऱ्या अध्यायांतील - 'वासांसि जीर्णा नि' हा दूरवा 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' हा २३ वा श्लोक पहा-

जशी टाकुनी जीर्ण वस्त्रे जुनी तीं
जगी लोक सारे नवी अन्य घेती
तसे टाकुनी जीर्ण देहा सदैव
शरीरें नवी घेतसे आत्मत्व - २२
न शस्त्रेंहि या छेदिती कोणतीही
नसे दस हा अग्निनेंही कदाही
जलानें न ये आद्रताही कदा या
न वायूस ये शुष्क यातें कराया - २३

दर अध्यायाच्या शेवटी येणारे इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु... द्वितीयोऽध्याय:। याबद्दल लेखकाने असे लिहिले आहे प्रत्येक अध्यायानुरुप त्यापैकी द्वितीय अध्याय समाप्तिला असे लिहिले आहे पहा -

मोहग्रस्त नराला बोधामृत पाजिले मुकुंदाने ।
द्वितीयाध्यायीं कथिला योगोत्तम सांख्ययोग ममतेने॥२॥

गीतेच्या श्लोकातला गर्भितार्थ यथायोग्य रीतीने अत्यंत सोप्या सुयोग्य शब्दरचनेने लेखकाने प्रगट केलेला आहे आणि मराठीत तर हा कृष्णार्जुनाचा संवाद त्यातील भावभावनांसह फार मोठे तत्त्वज्ञान आपल्याला सांगून जातो, मनाला भिडून जातो.

अध्याय तिसरा पहा

प्रभो सर्व कर्माशुनी त्वन्मताने
असे बुद्धि ही श्रेष्ठ जै निश्चयाने
तरी घोर हें कर्म मी का करावें
लढाया तुवां कां मला आग्रहावे ?- १
दुटप्पी असें बोलसी तू दयाळा
तयें पाडिसी मोह माझे मतीला
कथी एक ते श्रेयकारी मला जें
असें निश्चयें ज्यांत कल्याण माझें. - २

आता एकदम १८ व्या अध्यायातला शेवटचा ७८ वा श्लोक पहा -

जिथे योगमूर्ती प्रभू श्रीमुरारी
गुडकेश जेथे धनुर्बाणधारी
जय श्री तिथे नित्य ऐश्वर्य नीती
नृपा हाच माझा अभिप्राय अंती - ७८

उपसंहारात्मक हा उत्तमसा योग मोक्ष संत्यास
अठाव्या अध्यायीं सांगे त्रैलोक्यनाथ पार्थास ॥१८॥

हे दुर्मिळ पण अतिशय उपयोगी असं संजीवनी बालबोध गीता पुस्तक पहा. कुठे मिळाले तर मुलांना पाठांतर करायला व समजायलाही पुस्तक फार प्रभावी आहे. मुलांबरोबर मोठ्यांनीही समजून पाठ करायला हरकत नाही. संस्कृत गीता वाचतांना खालचे अर्थ वाचून समजून घ्यायला लागते तसे इथे होणार नाही. श्लोक वाचता वाचताच अर्थ समजतो. एका रिटायर्ड स्टेशन मास्तराने हे गीतेचे सुंदर भाषांतर केले आहे हे विशेष वाटते. संस्कृत न येणाऱ्याला सुद्धा गीता पाठ करता येईल तीही समजून उमजून. गीता ज्ञानाचा प्रसार होण्यास यामुळे फारच मदत होईल.

लेखक व प्रकाशक - वामन गोपाळ यत्ते,
रिटायर्ड स्टेशन मास्तर, मिरज
मूल्य - आठ आणे.
पृष्ठे - १७५

**- आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकिजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

aaa

# परिसर वार्ता

**जागतिक महिला दिन -**
**विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेनात**

८ मार्च २००६ रोजी जागतिक महिला दिन असतो. यावेळी ८ मार्च पासून परीक्षा सुरु होणार असल्याने तंत्रनिकेतनात ८ मार्च ऐवजी ७ मार्चला महिला दिन साजरा केला. आय.एस.टी.ई. (ISTE) तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आय.एस.टी.ई. च्या प्रमुख प्रा.सौ. गीताली इंगवले यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

डॉ. अजय ताम्हाणे (कन्सलटंट थेरपिस्ट) यांच्या व्याख्यानाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. मुलांशी पालकांनी कसे वागावे हे उदाहरणासहित त्यांनी 'सुजाण पालकत्वाचे' धडे दिले. हे व्याख्यान सर्वांना आवडले.

यानंतर पैशांची गुंतवणूक इन्युरन्स व पॉलिसीने कशी करावी यांवर एक माहितीपूर्ण व्याख्यान झाले. महिलांसाठी खास भोजन व्यवस्था आयोजित केली होती. महिलांसाठी संगीत खुर्ची इ. खेळांचे आयोजन केले होते. त्यांत सर्व तंत्रनिकेतनातील महिलांनी भाग घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

जागतिक महिला दिनानिमित्त तंत्रनिकेतनातील सर्व महिला एकत्र येऊन त्यांच्यामध्ये सुसवांद निर्माण झाला. या क्षणांची आठवण म्हणून प्रत्येकीला सुगंधी भेट देऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

१० मार्च २००६ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने MOEF आणि BAIF मार्फत एक व्याख्यान आयोजित केले होते.

या व्याख्यानांचा विषय होता ''डोमेस्टिक सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट''. व्याख्यात्या होत्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर तंत्रनिकेतनाचे प्राध्यापक श्री. वालावलकर यांनी




**डावीकडून प्राचार्या सौ. माधुरी पेजावर (बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय) यांचे प्राचार्य श्री. दि. कृ. नायक (विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन) स्वागत करताना**



**श्री. धनेश पाटील तंत्रनिकेतनातील कर्मचाऱ्यांना प्रात्याक्षिके दाखविताना**

प्रास्ताविकात कार्यक्रमाचे उद्दिष्ट सांगितले.

प्राचार्या सौ. पेजावर यांनी ओला कचरा व सुका कचरा वेगळा ठेवावा घरगुती घन कचऱ्याचे व्यवस्थापन कसे असावे हे सांगितले तसेच नैसर्गिक कचरा व माणसांनी निर्माण केलेला कचरा यांवर सविस्तर विवेचन केले.

भाजीचा उरलेला कचरा ही उपयुक्त ठरु शकतो. आपल्या व्याख्यानाच्या शेवटी प्लॅस्टिक बॅग वापरु नये असे कळकळीचे आवाहन सर्वांना केले. टाकाऊपासून खत निर्माण करणे ह्या गोष्टींचा उपयोग कसा होतो याचीही त्यांनी कल्पना दिली.

यानंतर गाडूंळ खतामुळे माती न वापरता फुलझाडे उत्तमरित्या वाढतात याचे प्रात्यक्षिक श्री. धनेश पाटील यांनी दाखविले. रासायनिक खते न वापरता नैसर्गिक कचरा वापरुन फुलझाडे, फळझाडे, शेती करता येते असे त्यांनी सोदाहरण दाखविले बायोगॅसही यापासून निर्मिता येतो हे त्यामार्फत समजले.

**विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील शैक्षणिक पारितोषिके**

'शैक्षणिक वर्ष ५-६' या वर्षात विद्यार्थ्यांनी तंत्रनिकेतनात पारितोषिके मिळवून आणली. ही पारितोषिके आंतर तंत्रनिकेतनातून ज्या स्पर्धा झाल्या त्यावेळी मिळालेली आहेत.

विद्यार्थ्यांचे परिश्रम, विभाग प्रमुखाचे मार्गदर्शन व प्राचार्यांचे प्रोत्साहन यामुळे हे यश विद्यार्थ्यांना प्राप्त झाले आहे.

विद्यार्थ्यानी मिळविलेली पारितोषिके पुढीलप्रमाणे आहेत.


१) **आयटी एकस्ट्रव्हॅगान्सा फिशन २००५** वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय आयोजित

महाविद्यालयीन प्रावीण्य चषक अरविंद मिश्रा व सौरभ पोंक्षे (एस.वाय.आय.एफ)

२) प्रकल्प स्पर्धा अभियंता संस्थेमार्फत आयोजित

पी.सी. बेस्ड ऑडियन्स रिस्पॉन्स सिस्टिम दुसरे पारितोषिक

भाविक दवे, रोहन राऊत वीरेश कुलकणी, अक्षय परब. (तृतीय वर्ष सी.ओ.)




**डावीकडून इनचार्ज कॉम्प्युटर इंजिनियरिंग सौ. दिवाकर, डॉ. श्रीरंग जोशी (स्टुडन्ट काउन्सेलर) प्राचार्य दि. कृ. नायक विजयी विद्यार्थ्यांसोबत**

थिंक क्रेस्ट २००६ बी.जी.आय.टी आयोजित प्रकल्प स्पर्धा

द्वितीय पारितोषिक महेश यादव, नितिश तावडे, इम्रान मेयान (तृतीय वर्ष आय. एफ.)




**डावीकडून इनजार्च आय.एफ.सी. उषा राघवन प्राचार्य श्री. दि. कृ. नायक विजयी विद्यार्थ्यासोबत**

व्हेंचुरा २००६ बी. व्ही.आय.टी. आयोजित प्रथम पारितोषिक रमीक्ष पूजी, शशांक देशपांडे, हर्षल तावडे, प्रवीण गवळी (तृतीय वर्ष आय.एफ.)

२७ जानेवारी २००६ रोजी आयोजित झालेले मनोहर फाळके तांत्रिक विषय प्रश्न मंजषा दुसरे पारितोषिक रमीझ पूजी, भास्कर आजगांवकर, (तृतीय वर्ष आय.एफ.)




**डावीकडून इनचार्ज आय. एफ. सौ. उषा राघवन प्राचार्य श्री. दि. कृ. नायक विविध पारितोषिके मिळविलेल्या विद्यार्थ्यांसोबत**

**तांत्रिक प्रकल्प प्रदर्शन दुसरे पारितोषिक** रमीझ पूजी, शशांक देशापांडे, हर्षल तावडे, प्रवीण गवळी (तृतीय वर्ष आय. एफ.)

**तांत्रिक प्रकल्प प्रदर्शन दुसरे पारितोषिक** रमीझ पूजी, शशांक देशापांडे, हर्षल तावडे, प्रवीण गवळी (तृतीय वर्ष आय.एफ.)

**राज्यस्तरीय प्रो-उत्सव २००६ प्रकल्प प्रदर्शन** स्पर्धा २००६ प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा के. के. वाघ तंत्रनिकेतन नाशिक आयोजित प्रथम पारितोषिक रमीझ पूजी, शशांक देशपांडे, हर्षल तावडे, प्रवीण गवळी( तृतीय वर्ष आय.एफ.) उत्तेजनार्थ पारितोषिक महेश यादव, नितेश तावडे, इम्रान मेमन (तृतीय वर्ष आय.एफ.)


**तंत्रनिकेतनातील शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग**

२७ फेब्रुवारी ते ३ मार्च २००६ या पाच दिवसाठी ''एम्बेडेड सिस्टित डिझाईन'' या विषयावर विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात प्रशिक्षण आयोजित केले होते. प्रशिक्षणाचे प्रायोजक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ होते.

प्रा. सौ. कीर्ती आगाशे, श्री. अरुण करकटे श्री. प्रमोद रानडे, ओंमकार कुलकर्णी, पराग मेहेंदळे यांनी वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने दिली.

'एम्बेडेड सिस्टिम' या नवीन विषयाला अनेक अभियांत्रिकी विषयात येत्या दशकात महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे. वॉशिंग मशीन, पी.डी.ए., व्ही.सी.डी, डिजिटल कॅमेरा, ऑटो मोबाईल्स, स्पेस शटल, अशा विविध ठिकाणी एम्बेडेड सिस्टिमचा प्रभाव वाढत आहे. कोणतेही कार्य कमी जागेत पूर्णत: स्वचंलित, कमी पैशात, कमी उर्जेत आणि सातत्यपूर्ण घडवण्यात या तंत्राचा उपयोग केला जाते आहे.

महाराष्ट्र राज्यतंत्रशिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रम सुधारणा प्रक्रियेत विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनला 'प्रोजेक्ट इन्स्टिट्यूट' म्हणून काम करण्याचा मान मिळाला आहे. या नवीन अभ्यासक्रमात ''एम्बेडेड सिस्टिम'' हा विषय विद्यार्थी शिकतील. त्या दृष्टीने शिक्षकांना मार्गदर्शन करुन तयार करणे ही महत्त्वाची जबाबदारी असते. यासाठी विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात महाराष्ट्रातील विविध तंत्रनिकेतनातील २० शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रा. सौ. कीर्ती आगाशे (इनचार्ज इंडास्ट्रिअल इलेक्ट्रॅनिक्स) यांनी या कार्यक्रमाची आखणी आणि संयोजन करण्याची जबाबदारी घेतली होती.




**डावीकडून प्राचार्य श्री. दि. कृ. नायक, श्री. अरुण करकरे, (माजी जनरल मॅनेजर, वेस्टर्न इंडिया एन्टरप्राईजेस, पुणे) प्रा. बी. पी. ताले ,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक, माजी प्राचार्य श्री.मुजुमदार**

या कार्यक्रमांच्या उद्‌घाटनासाठी महाराष्ट्रराज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक प्रा. बी.पी. ताले उपस्थित होते. प्राचार्य श्री. दि.कृ. नायक, माजी प्राचार्य श्री. श्री. सी. मुजुमदार तसेच श्री. अरुण करकरे (माजी जनरल मॅनेजर वेस्टर्न इंडिया एन्टरप्राईजेस, पुणे) यांचीही उपस्थिती होती.

या शिबिरात इंटरप्टस्‌, टाईमर्स, काऊंटर्स आणि प्रोग्रॅमिंग आणि प्रॅक्टिकल ॲप्लीकेशन 'PIC' ओव्हर व्ह्‌ अँड प्रोगॅमिंग अँड PWM एम्सॅम्पल्स Serial कम्युनिकेशन ॲड इंटरफेर्सिंग ॲडव्हान्स मायक्रोकंट्रोलर, DSP प्रोसेसर विषयांवर व्याखाने झाली.

### विद्या प्रसारक मंजळाचे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे
### उभरत्या वकिलांची वादविवाद स्पर्धा

विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ ठाणे विधी महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पहिली वादविवाद स्पर्धा दि. २५-२-२००६ रोजी मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागहात आयजित केली होती. त्यात मुंबई व ठाणे परिसरातील आठ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. वादविवाद स्पर्धेसाठी १) कोर्टाच्या बेअदबीकरता ''सत्य'' हा बचाव असावा का? २) भारतीय राज्य घटनेतील कलम ४४ वगळावे का? ३) राज्यपाल पदावरील व्यक्ती बिगर राजकीय असावी का? ४) पोट निवडणुकांचा खर्च राजकीय पक्षाने करावा का? हे विषय ठेवण्यात आले होते.

मा. श्री. एस. ए. द्विवेदी, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व मा. श्री. वि. पी. पाटील, माजी मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे या दोन माननीय व्यक्ती परीक्षक म्हणून कार्यक्रमाला उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या प्रचार्या सौ. श्री विद्या जयाकुमार आपल्या प्रास्ताविक




**डॉ. विजय बेडेकर मार्गदर्शन करताना**

भाषणात म्हणाल्या की विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरता अनेक वादविवाद स्पर्धा आयोजित केल्या पाहिजेत. स्व. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या जन्मदिनानिमित्त आम्ही ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करायचें ठरवले आहे. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीचं भान ठेवले पाहिजे. सामान्य माणासाला भारतीय घटनेची माहिती सहजपणे उपलब्ध असावी. माननीय श्री. वि. पी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले की डॉ. विजय बेडेकर यांच्या सारख्या ज्ञानी व जिज्ञासू माणसाला राज्यसभेचे सदस्यत्व बहाल करायला हवे.

सदरच्या वादविवाद स्पर्धेत आलेल्या आठ महाविद्यालयांच्या प्रतिनिधींपैकी शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेटच्या विद्यार्थ्यानी प्रथम क्रमांक पटकावत रु. ३०००/- चे रोख पारितोषिक पटकावले. दुसऱ्या क्रमांकाचे रोख रु. २०००/- चे पारितोषिक विधी महाविद्यालय, ठाणे यांनी पटकावले तर तिसऱ्या क्रमांकाचे रोख रु. १०००/- चे पारितोषिक न्यू लॉ कॉलेज, माटुंगा यांनी पटकावले. स्पर्धेतील उत्कृष्ट वक्ता श्री. श्रेयस श्रीधर

(शासकीय विधी महाविद्यालय) याने रु. १५००/- चे वैयक्तिक पारितोषिक मिळवून स्पर्धेत बाजी मारली. दुसरा उत्कृष्ट वक्ता म्हणून कु. प्राजक्ता शेणॉय (न्यू लॉ कालेज) हिची निवड करण्यात आली. तिला रु. १०००/- चे वैयक्तिक पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.


aaa

**विद्या प्रसारक मंजळाचे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे**
**वार्षिक स्नेहसंमेलन**

सालाबादप्रमाणे विधी महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारोह दिनांक ११ मार्च २००६ रोजी मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. र. उ. इंगुले माननीय सभासद, औद्योगिक न्यायालय, ठाणे हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षपद विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी भूषवले.

सदर कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्रचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.




**प्राचार्या श्रीदेवी अहवाल सादर करताना**

प्रमुख पाहुणे श्री. इंगुले तसेच सौ. इंगुले व श्री. करंदीकर यांचे हस्ते गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा व विविध कला व क्रीडा प्रकारातील विशेष नैपुण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे श्री. इंगुले व अध्यक्ष श्री. करंदीकर यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. श्री. इंगुले आपल्या भाषणात म्हणाले की महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांकरता केलेल्या सोयी सुविधा बघून अत्यंत प्रभावीत झालो आहे. त्याबद्दल व शिक्षणाबद्दल असलेली कळकळ पाहून त्यांनी मंडळांचे कौतुक केले.

त्यानंतर सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला व नंतर राष्ट्रगीताने कार्यक्रम संपन्न झाला.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभाग होळी व निरोप समारंभ**

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभागात सतत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. लहानपणापासुनच स्वावलंबन व मुलांवर चांगले सुसंस्कार व्हावेत, मुलांना भारतीय संस्कृतीची - परंपरेची माहिती व्हावी यासाठी दि. १३ मार्च रोजी म्हणजे होळीच्या आदल्या दिवशी शाळेच्या परिसरात होळी व निरोप समारंभाचा स्तुत्य उपक्रम संध्याकाळी ७.०० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ७.०० असा संपूर्ण रात्र सर्व मुले शाळेत राहण्याचा नवीन उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका व उत्साही सहाय्यक शिक्षिका व इतर कर्मचारी यांनी केले. रात्रीचे भोजन शाळेतच झाले. त्यानंतर मुलांनी मोठ्या आनंदाने हसत - खेळत होळीचा आनंद लुटला. उपस्थित असलेले सेवानिवृत्त शिक्षक श्री. प्र.ग. वैद्य व जादूगार श्री. माधव धामणकर यांनी होळी प्रज्वलित केली. होळी प्रदीपनानंतर



**सेवानिवृत्त शिक्षक - श्री. प्र. ग. वैद्य व जादूगार - श्री. माधव धामणकर होळी प्रज्वलित करतांना.**



**जादूगार श्री. माधव धामणकर कार्यक्रम सादर करतांना**

मुलांसाठी जादूगार श्री. माधव धामणकर यांनी जादूचा कार्यक्रम व 'हा खेळ सावल्यांचा' हा शॅडो प्ले चा कार्यक्रम सादर केला. मुले त्यांच्यावर बेहद खूष होती व टाळ्या वाजवून दाद देत होती. हा कार्यक्रम झाल्यावर गप्पागोष्टी करीत २५० मुले व शिक्षिका विद्यालंकार सभागृहातच झोपी गेल्या. सकाळी मुलांना दूध देऊन पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. एवढ्या मुलांची जबाबदारी घेणे हे काम सोपे नव्हे. अशारितीने मुलांवरील प्रेमाखातर हा नवीन उपक्रम अत्यंत यशस्वीरित्या पूर्ण झाला. पालकांनी सर्व शिक्षिकांना मन:पूर्वक धन्यवाद दिले.

परमनंट कलर प्रा. लि. तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत १८७ विद्यार्थी सहभागी झाले होते. या चित्रकला स्पर्धेत बक्षिसे मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

पहिला नंबर -१) मानसी नितीन पाटील - मोठा शिशु

दुसरा नंबर - १) नेहा गणेश लोखंडे - लहान शिशु

३तिसरा नंबर - १) आदित्य हेमंत शिंदे - मोठा शिशु

या तिन्ही मुलांना मेडल मिळाली आहेत.

उत्तेजनार्थ बक्षिसे मिळालेल्या विद्यार्थ्यांची नांवे :-

१) योगिता गुल्हाने २) ऋतुजा पांचाळ ३) गौरव जाधव

४) सिमरन खैरनार ५) प्राची तुरे ६) ओजस मेंगडे

७) यश भुंडे ८) रिध्दी काबाडी

रविवार दि. १२/२/०६ दासनवमीनिमित्त ब्राह्मण सभा, ठाणे. या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या पाठांतर व वक्तृत्व स्पर्धेत लहान शिशु - ५ विद्यार्थी व मोठा शिशु ५ विद्यार्थी अशा एकुण १० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यात खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

लहान शिशु - पहिला नंबर - कु. यश दिपक भुंडे
मोठा शिशु - पहिला नंबर - कु. मानसी नितीन पाटील

A



**डॉ. श्रीमती मेधा मुळगांवकर**

चंदीगड येथे १८ ते २० मार्च या दरम्यान झालेल्या 'अर्किडस् संवर्धन, विकसन व व्यापारिकरण' या व उपग्रहामार्फत झालेल्या परिषदेत वनस्पतिशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. श्रीमती मेधा मुळगांवकर यांनी ''ठाणे परिसरातील दुर्मिळ व नष्ट होण्याच्या शक्यता असणाऱ्या ''ऑर्किडेज्ची लागवड व संवर्धन - अर्किडारियाच्या साहाय्याने '' या विषयावर शोधनिबंध सादर केला. सदर परिषदेचे आयोजन 'ऑर्किड सोसायटी ऑफ इंडिया (टोसी)' या संस्थेने केले होते. या परिषदेत झालेल्या 'ऑर्किड शों'च्या परीक्षक म्हणूनही त्यांनी काम पाहिलें. २००५-६ या वर्षासाठी मुंबई विद्यापीठाने त्यांना या विषयातील प्रकल्पासाठी रु. ३५,०००/- चे विषेश अनुदान दिले आहे.



**प्रा. मोझेस कोलेट**

प्रतिवर्षी होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेची अंतिम ९ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या रुपारेल महाविद्यालयात झाली. या स्पर्धेत इंग्रजी, मराठी व गुजारथी भाषांमध्ये ३५० विद्यार्थी सहभागी झाले. होते.

या स्पर्धेच्या परीक्षक मंडळावर बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील प्रपाठक, डॉ. मोझेस कोले ट यांनी काम पाहिले. प्रकल्पाच्या परीक्षणासाठी ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये झालेल्या पारितोषिक वितरण समारंभातही प्रा. मोझेस कोलेट यांनी आपले मनोमत व्यक्त केले.

***जोशी बेडेकर महाविद्यालय***

*पुढील परिषद*

***बायोएथिक्स्***

***अर्थात***

***जैवनीती***

***या विषयावर***

***ता. २४-२५ जानेवारी २००७***

***विद्या प्रसारक मंडळाचे***

***तंत्रनिकेतन***

*आयोजित*

***राष्ट्रीय परिषद***

***जीऑ-इन्फॉर्मेटिक्स्***

***ता. ८-९ डिसेंबर २००६***

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## • विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मराठी माध्यम)

२) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा

३) के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

४) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

७) वि.प्र.मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

६) वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन

७) डॉ. वा. ना. बेडेकर संशोधन व व्यवस्थापन अभ्यास संस्था

८) प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

१) भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला

२) दिशा व्यासपीठ

३) डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान

४) १ ऑगस्ट विद्या प्रसारक मंडळाचा वर्धापन दिन

५) नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन

६) ५ सप्टेंबर, दिक्षांत समारंभ

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

## विद्या प्रसारक मंडळ

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.

# विद्या प्रसारक मंडळ

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२

माननीय वाचक,

विद्या प्रसारक मंडळ ही महाराष्ट्रातील 'दिशा' सारखे नियनकालिक स्वरुपी वैचारिक व्यासपीठ उपलब्ध करून देणारी एकमेव शिक्षण संस्था आहे. वैचारिक, साहित्याचा प्रवाह आटत असताना आमचा हा एकांडा प्रयत्न चालू आहे. या प्रयत्नास या वर्षी जुलै २००६ मध्ये १० वर्षे पूर्ण होतील. या वाटचालीत अनेक वाचक, जाहिरातदार व देणगीदार यांचा वाटा मोलाचा आहे याची आम्हाला नम्र जाणीव आहे.

या दशकपूर्तीच्या निमित्ताने आपणास विनम्र आवाहन आहे की आपण ...

१. वर्गणीदार होऊन (वार्षिक रू. २५० /-)
२. लेखनास सहकार्य करून
३. प्रसार करून
४. आप्तांसाठी भेट वर्गणी भरून
५. देणगी देऊन (८०जी अंतर्गत आयकर सवलत प्राप्त आहे.)

विद्या प्रसारक मंडळाला सहकार्य करू शकता. धनादेश किंवा धनाकर्ष '**विद्या प्रसारक मंडळ खाते दिशा**' या नावाने काढावा.

---

## प्रतिसादपत्र

मी ______________________________ आपले वरील आवाहन वाचले असून मी

१. वर्गणीदार होऊन (वार्षिक रू. २५० /-) ☐
२. लेखनास सहकार्य करून ☐
३. प्रसार करून ☐
४. आप्तांसाठी भेट वर्गणी भरून ☐
५. देणगी देऊन ☐

(आपण योग्य त्या पर्यायासमोर ✓ खूण करावी.)

या अन्वये विद्या प्रसारक मंडळाला सहकार्य करू इच्छित आहे. सोबत वर्गणी / भेटवर्गणी / देणगी पत्त्यासह धनादेश / धनाकर्ष पाठवीत आहे. पावती माझ्या खालील पत्त्यावर पाठवावी.

माझे स्नेही ______________________________ (दूरध्वनी )

यांच्याशी आपण माझे नाव सांगून संपर्क केल्यास ते सकारात्मक प्रतिसाद देतील.

माझा स्वलिखित /आधारित / भाषांतरित लेख (मूळ लेखक / प्रकाशक यांच्या परवानगीसह) पाठवीत आहे. याचा विचार व्हावा ही विनंती. शैक्षणिक संस्थेस मदत असे या सहकार्याचे स्वरूप असल्याने माझी मानधनाची अपेक्षा नाही.

नाव ______________________________

पत्ता ______________________________

______________________________

स्वाक्षरी

दूरध्वनी : दिनांक